# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक १७ जुलै, २०२५
## (सकाळी ०९.०० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**(अ) : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(गुरुवार, दिनांक १० जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते ५)**

**(१) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईतील बोरिवली (पूर्व), संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन विभागाच्या जागेतील २५,१४४ आदिवासी व अतिक्रमित झोपडीधारकांचे पुनर्वसन करुन अतिक्रमणे निष्कासित करण्याचे दि. ७-५-१९९७ रोजी मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले असतानाही अद्याप याबाबत २८ वर्षे इतका कालावधी होऊनही २५,१४४ पैकी १३७८६ झोपडीधारकांचे पुनर्वसन करणेबाबत शासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने सदरहू झोपडीधारकांचा प्रश्न अद्यापही प्रलंबीत अवस्थेत असणे, एकूण पात्र झोपडीधारकांपैकी दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील सीएस क्र. २३९/१ मधील वन विभागाच्या जागेतील रु. ७०००/- शुल्क भरलेल्या पात्र झोपडीधारकांचे अद्यापही पुनर्वसन करण्यात न येणे, शासनाचे वन विभागाचे व एसआरए प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी पुनर्वसनासाठी निश्चित केलेली आरे वसाहतीतील वन क्षेत्राची ९० एकर जागा ही संवेदनशील क्षेत्र म्हणून शासनाने दि. ५-१२-२०१६ रोजी शासन निर्णय जारी केला असल्याची माहिती लपवून सदरहू ९० एकर जागेत झोपडीधारकांचे एसआरए योजने अंतर्गत पुनर्वसन करण्याचा धक्कादायक निर्णय घेणे, संजय गांधी उद्यान हे मुंबईचे ऑक्सीजन स्त्रोत असून ते अतिक्रमण मुक्त करण्यास २८ वर्षे कालावाधी पूर्ण होऊनही ठोस कृती न झाल्याने शासनावर गंभीर ताशेरे ओढून उद्यान अतिक्रमण मुक्त करण्याचे मा.उच्च न्यायालयाने दि. १४-१-२०२५ रोजी शासनास आदेश देणे, त्यानुसार शासनाने उर्वरित १३७८६ झोपडीधारकांचे पुनर्वसन करणेसाठी कृती आराखडा तयार करुन तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री. रईस शेख, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"अनाथ विद्यार्थ्यांना पालक व पालकत्व नसल्यामुळे शिक्षणामध्ये अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, कोणत्याही संस्थेने शिक्षण देण्याकरिता आपला हात पुढे केला असला तरी त्यांना शिक्षणासाठी येणारा खर्च देण्यास शिक्षण संस्थेकडे निधीची कमतरता असल्यामुळे अनाथ विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असणे, खाजगी मदतीवरच अनाथ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च अवलंबून असणे, दिनांक ६ एप्रिल, २०२३ रोजी महिला व बालविकास विभागाने शासन निर्णय निर्गमित केलेला असणे सदर शासन निर्णयामध्ये अनाथ विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन शिक्षणाचे शुल्क भरण्याची तरतूद केलेली नसणे, त्यामुळे अनाथ विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असणे, अनाथ विद्यार्थ्यांसाठी "थेट शिक्षण शुल्क भरपाई योजना" राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री. देवराव भोंगळे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"नांदाफाटा (ता. कोरपना, जि. चंद्रपूर) येथे असलेल्या अल्ट्राटेक, माणिकगड सिमेंट कंपनीव्दारे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याची तक्रार नागरिकांनी शासनाकडे वारंवार करणे, सदर कंपनीच्या परिसरामध्ये प्रदूषण नियंत्रण करणाऱ्या मशिनरी अकार्यक्षम असणे, प्रदूषण कमी करण्याबाबत या भागातील नागरिकांनी आंदोलने, मोर्चे काढून आपली तक्रार दाखल केल्यानंतर सुध्दा कोणतीही कारवाई न होणे, कंपनीच्या व्यवस्थापक मंडळाने पर्यावरण प्रदूषण विषयक प्रकरणे पूर्णपणे दाबली जात असल्याची बाब समोर येणे, कंपनीच्या प्रदूषणामुळे परिसरातील नागरिकांना क्षयरोग, कर्करोग, श्वसनाचे रोग, चर्मरोग सारखे आजार झाले असल्याची बाब समोर येणे, या कारखान्यातून निघणारे सांडपाणी उघड्या मार्गाव्दारे विविध नदी व नाल्यांमध्ये सोडले जात असल्यामुळे जलप्रदूषणाची समस्या समोर येणे, सदर कारखान्याच्या प्रदूषणाला दरवर्षी प्रदूषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण विभागाकडून प्रदूषण होत नसल्याची क्लिनचीट मिळत असणे, सदरहू बाब गंभीर असल्याने या कारखान्यांवर शासनाने तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) डॉ. नितीन राऊत, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"विदर्भातील अनेक तालुक्यात अनेक दुर्गम आदिवासी पाडे येत असल्यामुळे तेथे पावसाळ्यात जाणे शक्य होत नसणे, या दुर्गम आदिवासी पाड्यांमध्ये अनेक विद्यार्थी प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित रहात असणे, पावसाळ्यात येथील नदी-नाल्यांना पूर येत असल्यामुळे

या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी शासनाने काही निवासी शाळा सुरु करणे, येथे विद्यार्थी उत्तम शिक्षण घेत असले तरी त्यांचे बालपण हिरावून घेतले जात असणे, विद्यार्थ्यांना कुटुंबापासून दूर रहावे लागत असणे, याउलट जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थी दुपारी घरी गेल्यानंतर आई-वडील व कुटुंबियांसोबत वेळ घालवत असल्याने त्यांची आकलन क्षमता निवासी शाळांतील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक असणे, त्यामुळे दुर्गम भागातील आदिवासी पाडे व गावांमधील विद्यार्थ्यांना घराजवळच दर्जेदार शिक्षण घेता यावे, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणता यावे, यासाठी अशा भागातील जिल्हा परिषद शाळा टिकवून ठेवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री. महेश शिंदे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात खाद्य उद्योगांमध्ये पदार्थाचे आकर्षण ग्राहकांला होण्याकरिता वेगवेगळे खाद्य रंग वापरले जात असणे, नैसर्गिक रंग वनस्पती, प्राणि आणि खनिजांमधून मिळविले जात असणे, कृत्रिम रंग रासायनिक प्रक्रियेव्दारे तयार करण्यात येणे, सदरहू खाद्यरंग हे आरोग्यास अपायकारक असून देखील त्यांना आयएस मानांकन दिले जात असणे, रासायनिक रंगामुळे खाद्यपदार्थाचे आकर्षण वाढविण्यासाठी सिंथेटिक पदार्थाचा वापर करण्यात आल्यामुळे ते मानवाच्या आरोग्यास अपायकारक असणे, यातील कित्येक रंगामुळे कॅन्सर व अन्य रोग उद्‌भवत असल्यामुळे मानवी आरोग्यास अपायकारक असणे, त्यामुळे अन्य देशांत असे रंग वापरण्यास बंदी घातलेली असतांना देखील आपल्या देशात सर्रासपणे त्याचा वापर होत असणे, नैसर्गिक रंगाचा वापर खाद्यपदार्थांमध्ये करण्याची आवश्यकता, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार असणे, या संदर्भात केंद्र शासनाचा आयएस स्टँडर्डचे मानांकन बदलण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने खाद्यपदार्थामध्ये वापरण्यात येणाऱ्या खाद्य रंगाचे टॉक्सिक स्टडी करुन त्यांच्या मानांकनामध्ये बदल करण्याबाबत कायदा करण्याची आवश्यकता, निसर्गाचे रक्षण करण्यासाठी आणि नवीन ऊर्जा स्त्रोतांचा शोध घेण्यासाठी प्रगत तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी क्वांटम फिजिक्स आणि बायोलॉजिकल अप्लाईड सायन्सचा वापर करुन औद्योगिक क्षेत्रामध्ये लॅब आणि त्यावरती संशोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांना इन्फ्रास्टक्चर उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक १५ जुलै, २०२५ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (क्रमांक ६ व ७)**

**(६) श्री. राजन नाईक, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"पावसाळ्यात कोणत्याही प्रकारची दुर्घटना होऊ नये यासाठी वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अखत्यारीतील जिल्हा परिषद शाळांच्या

इमारतींचे संरचनात्मक लेखापरीक्षण करण्यात येणे, लेखापरीक्षण अहवालात अंदाजे ९० शाळांपैकी ११ शाळा अतिधोकादायक स्थितीत असल्याचे आढळून येणे, काही शाळा या अनेक वर्षे जुन्या असल्याने अशा शाळांच्या भिंतींना तडे जाणे, प्लास्टर निखळून पडणे, फरशी तुटणे, छतगळती अशा अनेक समस्या असणे, जुलै २००९ मध्ये महापालिका स्थापन झाल्यापासून वसई - विरार शहरात पालिकेने एकही शाळा उभारण्यात न येणे, कार्यक्षेत्रात येत असलेल्या जिल्हा परिषद शाळा महानगर पालिकेकडे हस्तांतरित करण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत असणे, तेथील जनतेने आपल्या मालकीच्या अनेक जमिनी तत्कालीन लोकल बोर्डाच्या शाळा उभारण्यासाठी दान म्हणून दिलेल्या असणे, आता तेथे नवीन शाळा उभारताना वाद निर्माण होऊ नये यासाठी अशा जागांची शासन दरबारी नोंद होण्याची नितांत आवश्यकता, वसई–विरार शहर महापालिका क्षेत्रातील जिल्हा परिषद शाळांची झालेली दुरवस्था पाहता सदरहू शाळा महापालिकेकडे हस्तांतरित करून शाळांची दुरुस्ती करण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत तातडीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री. अस्लम शेख, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईच्या पश्चिम उपनगरातील मालाड (प) मालवणी, दादासाहेब गायकवाड नगर येथे म्हाडाचे २५०० बैठे निवासी गाळे असणे, शासनाने दि. १८/०५/१९८७ रोजीच्या शासन निर्णयान्वये बैठे निवासी गाळे विक्री योजना लागू करण्यात येणे, त्यानुसार सन १९९३ मध्ये गाळेधारकांच्या संमती पत्रकानुसार परवानगी देण्यात येणे, परंतू सदर योजनेस अत्यल्प प्रतिसाद मिळणे, २५०० बैठे निवासी गाळेधारकांपैकी १४२९ निवासी गाळ्यांना विक्री योजनेअंतर्गत सहभागी करण्यात येणे, उर्वरित १०७१ बैठे निवासी गाळेधारक अपरिहार्य कारणामुळे योजनेत सहभागी न होणे, बैठे निवासी गाळेधारक अत्यल्प उत्पनधारक असल्याने सदरच्या विक्री योजनेत सहभागी होता आलेले नसणे, शासनाने १०७१ बैठे निवासी गाळे धारकांसाठी नवीन विक्री योजना जाहिर करुन निवासी गाळे हस्तांतरीत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्री. सत्यजित देशमुख, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"चांदोली (ता.शिराळा, जि.सांगली) धरण/अभयारण्य परिक्षेत्रातील गावांचे पुनर्वसन सन १९७८ ते २००० या कालावधीत सांगली, कोल्हापूर या ठिकाणी करण्यात येऊनही प्रकल्पग्रस्तांना कोणत्याही नागरी सोयी सुविधा उपलब्ध न केल्याचा गंभीर प्रकार माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, सदरहू ठिकाणाच्या प्रकल्पग्रस्तांना पर्यायी गावठाण जमीन देण्याचे आश्वासन शासनाकडून देण्यात येणे, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन

करताना त्यांच्या मूळ गावातील घरांची आणि जमिनींची नुकसान भरपाई देऊन सरकारने जमीन व घरांचे संपादन करुन नुकसान भरपाई पोटी देण्यात आलेल्या रक्कमेतून शासनाने प्रकल्पग्रस्तांची मूळ जमीन संपादन करताना ६५ टक्के रक्कम कापून घेण्याबरोबरच पुनर्वसनासाठी पात्र होण्यासाठीची पुनर्वसन कायद्याची ११ ते १४ कलमे लागू करावी लागतात ती केलेली नसणे, प्रकल्पग्रस्त पुनर्वसनासाठी पात्रच होऊ न शकणे, प्रकल्पग्रस्तांनी वारंवार मा.मुख्यमंत्री, महसूल मंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री, वने मंत्री तसेच लोकप्रतिनिधीं, जिल्हाधिकारी कार्यालय व उप वन संरक्षक यांच्याकडे निवदने, आंदोलने करुन सुध्दा त्यांना अद्यापी न्याय मिळालेला नसणे, उपरोक्त गंभीर प्रकारामुळे चांदोली धरणग्रस्त/अभयारण्य प्रकल्पग्रस्तांमध्ये शासनाप्रती प्रचंड नाराजी व असंतोषाची भावना निर्माण होणे, या गंभीर प्रकरणी चौकशी करुन, प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन कायदयातील कलम ११ ते १४ लागू करण्यासाठी कार्योत्तर मंजुरी देऊन प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन, मोबदला व सर्व सोयी सुविधांची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**(९) श्री. गोपीचंद पडळकर, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"महाराष्ट्रातील होलार समाज अनुसूचित जातीतील (SC) २६ व्या क्रमांकावर असून या समाजाचा पारंपारिक व्यवसाय वाद्य वाजविणे, जुन्या चपला शिवणे हा असणे, या समाजाकडे शेत जमीन नसल्याने तारण मिळत नसणे, त्यामुळे उद्योग व्यवसायासाठी कर्जही मिळत नसणे, तसेच शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याने बेरोजगारी व गरीबीचे प्रमाण जास्त असणे, महाराष्ट्र शासनाने १९७४ साली होलार, चांभार, ढोर व मोची या समाजासाठी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ स्थापन करणे, परंतु सदर महामंडळ स्थापनेपासून होलार समाजाला या महामंडळामध्ये कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधीत्व मिळालेले नसणे, सदर महामंडळ स्थापनेपासून अध्यक्ष व संचालक नसणे, माहिती अधिकाराखालील माहितीच्या आधारे असे दिसून येणे की २% सुध्दा कर्ज वाटप झालेले नसणे, त्यामुळे होलार समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे गरजेचे असून याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेली असणे, राज्यात ५० लाखाच्या पुढे होलार समाजाची लोकसंख्या असून महाराष्ट्रातील विविध भागात व्यवसायानुसार मातंग, चांभार, मोची अशा चुकीच्या नोंदी लागलेल्या असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांनी नेमलेल्या अभ्यास गटाने सिध्द करणे, त्यामुळे होलार समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१०) श्री. विजय शिवतारे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"प्रकाशचंद्र जैन बहुउद्देशीय संस्था जामनेर अतंर्गत शाळा, ज्युनियर कॉलेज, आर्युवेदीक कॉलेज, फिजिओथेरपी कॉलेज, होमिओपॅथी कॉलेज आदि सुरु असणे, सदर संस्थेने बांधकाम संदर्भात नगर रचना व मुल्यांकन विभाग जळगांव यांचेकडे प्राप्त माहिती नुसार बहुउद्देशीय संस्था जामनेर यांना मौजे पळास खेडा बुद्रुक, ता. जामनेर येथील गट न. ८६/१/१,८६/१/२, ८६/२/१ ८२/१/१ व ८२/१/२, मधील बांधकाम परवानगी बाबतचे सर्व तारखांचे अवलोकन केले असता सर्व दाखले बोगस आणि बनावट कागदांच्या आधारे असणे, अग्निशमन विभागाचा ना हरकत दाखला देखिल बोगस व बनावट असणे, सदर बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या गौण खनिजापोटी आवश्यक रॉयल्टी शुल्क न भरणे, याबाबत महसूल विभागाची दिशाभूल करणे, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकव्दारे संस्थेस दिलेल्या विवीध मान्यता बोगस आणि बनावट दस्त दाखल केलेले आढळून येणे, सदर संस्थेने अनेक शासकीय विभागांकडून बोगस व बनावट दस्तऐवज दाखल करुन शासनाचे लाखो रुपयांचे अनुदान काढलेले असणे, याअनुषंगाने सदर शैक्षणिक संस्थेच्या सर्व मान्यतेबाबत चौकशी होणे आवश्यक असणे व त्यानुसार सदर मान्यता रद्द कण्यासंदर्भात व बोगस कागदपत्रांद्वारे मान्यता घेऊन शासनाची फसवणुक केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रीया व करावयाची कार्यवाही."

**(११) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मानवी स्वास्थ्याच्या समस्या दिवसेंदिवस वाढत असणे, अश्या स्थितीत समाजाला स्वास्थपूर्ण व समृध्द बनविण्यासाठी योगसाधनेशिवाय पर्याय नसणे, वैश्विक स्तरावर देखील उत्तम शारीरिक स्वास्थ्याचा पर्याय म्हणून योगास मान्यता मिळणे, योगसाधनेबाबत जनजागृती करून समाजाला सुदृढ ठेवण्यासाठी योगशिक्षक स्वयंप्रेरणेने व निस्वार्थ वृत्तीने निरंतर कार्य करीत असणे, गुजरात, हरीयाणा, राजस्थान या राज्यांप्रमाणे महाराष्ट्रात योग आयोग स्थापन करण्याची आवश्यकता, महाराष्ट्र योग शिक्षक संघ या संघटनेने महाराष्ट्रात योग आयोग स्थापन करावा या प्रमुख मागणीसह इतर काही महत्वपूर्ण मागण्या शासनाकडे केलेल्या असणे, सदर मागण्यांची तातडीने पूर्तता होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(बुधवार, दिनांक १६ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली अर्धा तास चर्चेची सूचना क्रमांक १२)**

**(१२) श्री. संजय केळकर, वि.स.स.**

"राज्यातील अनेक विकास प्रकल्पांना महारेराने बजाविलेल्या नोटीसा" या विषयावरील श्रीमती सरोज अहिरे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५०० ला दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(ब) : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(१) सर्वश्री. गजानन लवटे, कृष्णा खोपडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्य शासनाच्या दिनांक १ एप्रिल, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्व परवानग्या ऑनलाईन पध्दतीने देण्याचे सक्तीचे केलेले असतांनाही अकोट नगरपरिषद (जि.अकोला) हद्दीतील दर्यापूर रोडवरील स.न.६४२, नझुल शिट नं.२१, लेआऊट प्लॉट नं. १ए—१बी ते ६ए ते ६बी मध्ये रहिवास व वाणिज्यिक वापराकरीता ओपन स्पेस व लेआऊट अंतर्गत रस्ते वाचवण्यासाठी बोगस गुंठेवारी दर्शवून सर्व गुंठेवारी भुखंड एकत्रिकरणाची कार्यवाही करण्यात येणे, एकाच दिवसात बॅक डेटमध्ये विकासकास जा.क्र.अनप/कावि क्र.नरबांधप/ १४९/२०२२, दि.१८ एप्रिल, २०२२ अन्वये एकूण क्षेत्र ५७१९.२१ चौ.मी. रहिवास व वाणिज्यिक वापराकरीता व्यावसायीक बांधकाम परवानगी देणे, सदर परवानगी देतांना भुमि अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करण्यात न येणे, शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असल्याचे स्थानिक नागरीकांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर संबंधित विकासकाने १७ लाख रुपयांचा बुडीत महसूल शासन जमा करणे, त्यामुळे सदरची बांधकाम परवानगी देतांना तत्कालीन मुख्याधिकारी व रचना सहाय्यक यांनी स्वत:च्या आर्थिक स्वार्थापोटी शासनाच्या नियमांची पायमल्ली केल्याचे स्पष्ट होणे, तसेच रेरा कायद्यानुसार ५०० मीटर पेक्षा जास्त असलेल्या बांधकामाला रेरा नोंदणी करणे बंधनकारक असतांना २६०० मीटर पेक्षा जास्त असलेला सदर प्रकल्प विनानोंदणी हस्तांतरणाचे दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करणे सुरु असणे, शासनाने उक्त प्रकरणी पादर्शक चौकशी करुन शासनाच्या नियमांची पायमल्ली करुन शासनाचा महसूल बुडविणा-या भ्रष्ट अधिका-यांवर कारवाई करण्याची तसेच सदरची व्यावसायिक बांधकाम परवानगी तातडीने रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

**(२) श्री. महेश लांडगे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील मिळकती भाडेपट्टा करार मुक्त (फ्री होल्ड) करण्याबाबत पावसाळी अधिवेशन-२०२४ मध्ये लक्षवेधी मांडली असणे, त्यानुसार 'पीएमआरडीए'च्या अधिकारातील प्राधिकरणाच्या प्रॉपर्टी फ्री होल्ड करण्याचा निर्णय मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला असणे, मात्र अद्याप पीसीएमसीच्या अधिकारातील नवनगर प्राधिकरणाच्या हद्दीतील प्रॉपर्टी फ्री होल्ड करण्याचा निर्णय झालेला नसल्याची बाब माहे मे, २०२५ च्या दरम्यान समोर येणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या ताब्यातील निवासी ८ हजार ३७९ भूखंड व त्यावरील मालमत्ताधारक यांना 'फ्री होल्ड' निर्णयाच्या कक्षेत घ्यावे, अशी मागणी होत असणे, सदर प्रॉपर्टी शासन मालकीची असणे व भाडेपट्ट्याने वापरासाठी देणे या किचकट प्रक्रियेमुळे वारसांमध्ये वाद, हक्कांबाबत वाद, अतिक्रमण आणि बेकायदा झोपडपट्टी, अनधिकृत बांधकाम अशा समस्या निर्माण झाल्यामुळे प्राधिकरणाच्या विकसित मालमत्ता भाडेपट्टा करारमुक्त म्हणजेच 'फ्री होल्ड' करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(३) सर्वश्री. पराग शाह, मिहीर कोटेचा, अमिन पटेल, नानाभाऊ पटोले, अस्लम शेख, विकास ठाकरे, अमित विलासराव देशमुख, संजय मेश्राम, मनोज जामसुतकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शहरात जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींचा गेल्या अनेक वर्षांपासून पुनर्विकास झालेला नसल्यामुळे मुंबईमधील उपकर प्राप्त इमारती जुन्या व मोडकळीस आल्या असणे, या इमारतींमध्ये राहणाऱ्या असंख्य मुंबईकरांच्या मनामध्ये कधीही इमारत ढासळण्याची भीती निर्माण झालेली असणे, जुन्या इमारतीचा जलद गतीने पुनर्विकास करण्यासाठी विकास नियमन नियमावली ३३ (७) मधील तरतुदीमध्ये सुधारणा करण्याची गरज असणे, सध्या जर एखादे घर हे १२० चौरस मीटर क्षेत्रफळ पेक्षा मोठे असेल तर त्याचा निर्माण शुल्क भाडेकर यांना द्यावा लागणे, तसेच ३३(७) अंतर्गत या घरांसाठी देण्यात येणारी प्रोत्साहन (इन्सेन्टिव्ह) योजनेचा लाभ न घेणे, त्याचप्रमाणे शहरात पागडीचा सेस बिल्डिंगसाठी कायदा करण्यात आला असणे, त्यानुषंगाने जर इमारत मालकाने C-१ इमारत निष्कषित झाल्यानंतर सहा महिन्यात सर्व परवानग्या IOD-CC घेऊन कामाची सुरुवात नाही केली तर भाडेकरूना सहा महिन्यात त्यांचा विकासक नेमून इमारतीचा पुनर्विकास करण्याची परवानगी असणे, त्याच प्रमाणे हा कायदा उपनगर मधला C१-कॅटेगरीच्या इमारतींसाठी नसल्यामुळे घरमालक यांनी शेकडो CI इमारती निष्कषित केल्या असणे, परंतु पाच पाच वर्ष त्या इमारतींचा पुनर्विकास न होणे, त्यामुळे उपनगरातील हजारो मुंबईकर बेघर झालेले असणे, बेघर झालेल्या

मुंबईकरांना ना कोणी भाडे देत ना त्यांच्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी काही हालचाल करत त्याचप्रमाणे पागडीचे घर पुनर्विकास करताना S.R.A प्रमाणे कमीत कमी ३०० चौरस फुटांचे घर बांधून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

(४) **सर्वश्री महेश बालदी, प्रशांत ठाकूर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) लक्ष वेधतील :-**

"सिडको प्रशासनाने नवी मुंबई क्षेत्र विकसित करताना पनवेल/उरण तालुक्यात मुलभूत सोयी सुविधा देताना पाणी पुरवठ्यासारख्या अत्यंत मुलभूत प्रश्नाकडे सिडको प्रशासनाचे दुर्लक्ष झाले असणे,उक्त तालुक्यात पाणी पुरवठा करण्याकरिता सिडको प्रशासनाला नवी मुंबई महापालिका/एमजेपी/ एमआयडीसी या घटकांवर अवलंबून रहावे लागत असणे, सिडको प्रशासनाच्या नियोजन शून्य कारभारामुळे उक्त तालुक्यातील नागरिकांना अनेक वर्ष सातत्याने अपु-या व कमी पाणी पुरवठ्याचा सामना करावा लागत असणे, पनवेल, उरण या तालुक्यांमध्येच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तयार होणारे गृहनिर्माण प्रकल्प, नैना प्रकल्प या प्रकल्पांमुळे वाढती लोकसंख्या पाहता भविष्यात नागरिकांना तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार असणे, उक्त तालुक्यात सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या लोकसंख्येला पाणी पुरवठा करण्यास सिडको प्रशासन असमर्थ ठरत असणे, अपुऱ्या पाणी पुरवठयामुळे विशेषत्वाने खारघर व कामोठे विभागातील नागरिकांच्या रोषाला स्थानिक लोकप्रतिनिधींना सातत्याने सामोरे जावे लागत असणे, सद्यस्थितीत वसाहतीमध्ये होणारा अपुरा पाणीपुरवठा यासाठी मुळ स्त्रोतामधून येणारे कमी पाणी तसेच पुरवठा करणाऱ्या व्यवस्थेवर सिडकोचे नियंत्रण नसणे, त्यामुळे जोपर्यंत या सर्व वसाहतींमध्ये आवश्यक पाणी उपलब्ध होणार नाही तोपर्यंत कोणत्याही नव्या इमारतींना काम सुरू करण्याची परवानगी अथवा काम पूर्णत्वाचा दाखला देण्यात येवू नये अशी नागरिकांची तीव्र मागणी असणे, शासनाने तातडीने सक्षम प्राधिकरण बनवण्याची आवश्यकता त्यावर शासनाने त्वरीत करावयाची आवश्यक ती कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री. रईस शेख, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) लक्ष वेधतील :-**

"भिवंडी—निजामपूर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत डबघाईची असणे, मनपातर्फे अनेक कामे सुरु असणे, सध्यस्थितीत मौ.चाविंद्रा-पोगाव येथील आरक्षण क्रमांक १२४-अ या भूखंडावर प्र.आवास योजनेतंर्गत ६३४८ घरांचा प्रकल्प प्रस्तावित, सध्याच्या दराने सदर प्रकल्पाची किंमत १००० कोटी रुपये असणे, भिवंडी शहर हे मजुरांचे शहर असणे, या ठिकाणी आर्थिक दुर्बल घटकांसाठी लोकांनाही घरे परवडणारी नसणे, त्याचबरोबर सदर प्रकल्प

हा शहराच्या मध्यभागी असून व मनपाच्या कचरा डम्पिंग ग्राऊंडच्या लगत असणे, व यापेक्षा बऱ्याच कमी किंमतीत घरे विक्रीसाठी उपलब्ध नसणे, असे असतांनाही मनपाने प्रकल्प हाती घेण्यापूर्वी कार्यक्षमता, साध्यता, शक्यता तपासणे गरजेचे असतांनाही प्रकल्प प्रस्तावित करणे, त्याच बरोबर मनपा क्षेत्रामधील धोकादायक व जुन्या / मोडकळीस आलेल्या इमारतीचा समूह विकास पध्दतीने पुर्नविकासास चालना मिळण्याकरिता सदर योजने अंतर्गत विकास करावयाच्या क्षेत्रामध्ये पुर्ननिमाण करतांना वाढी व घनतेनुसार लागणारे आवश्यक रुंदीचे रस्ते, खुले क्षेत्र व इतर आवश्यक सोयी सुविधा पुरविणे अशक्य होणे, त्याकरिता एकत्रिकृत वि.नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील विनियममध्ये शिथिलता आणण्याची, प्र.क्र.१० मध्ये City S.Regulation अंतर्गत मनपासाठी विशेष तरतुदीची आवश्यकता, मनपा कार्यक्षेत्रात सी.सी.टी.व्ही. बसविण्याकरिता रस्ता खोदतांना मनपाची जलवाहिनी, इलेक्ट्रीक केबल नादुरुस्त करणे, रस्ता खोदाई करतांना जेसीबी मशिनच्या सहायाने शहरातील मुख्य दळणवळणाचे रस्ते खोदुन डेब्रीज व इतर मटेरियल न उचलता तेथेच ठेवल्यामुळे नागरिकांना होत असलेली अडचण, जागोजागी खोदकाम केल्यामुळे अनेकदा होत असलेले अपघात, तसेच रस्ताखोदाई परवानगी मिळण्याकरिता अर्ज केले असता विनाशुल्क देण्यात आलेली परवानगी, उक्त कंपनीकडून कोणतेही रस्ते खोदाई शुल्क न आकारल्यामुळे जलवाहिनी, इलेक्ट्रीक केबल दुरुस्तीचा खर्च मनपाला करावा लागणे, रस्ता दुरुस्तीकरिता अंदाजे रक्कम रुपये ३५,०१,४२,६८२/- इतका खर्च अपेक्षित असणे, उक्त कंपनीकडे रस्ते दुरुस्तीचा खर्च वसुल करणे अथवा रस्ते तात्काळ दुरुस्ती होणे आवश्यकता तसेच मनपाची स्थिती पाहता शासनाने रस्ता दुरुस्तीकरिता निधी उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता, ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो-५ प्रकल्पात भिवंडी विभागात भुयारी मार्गाऐवजी पूर्वीप्रमाणे उन्नत मार्गाने मेट्रो उभारण्याची मागणी होणे, व भिवंडी शहरातील स्व. बाळासाहेब ठाकरे व स्व. राजीव गांधी उड्डाणपूलांचे पुर्ननिर्माण करून नागपूरच्या धर्तीवर मेट्रोसह उड्डाणपूल उभारणी आवश्यक असणे, शहरातील अनेक रस्ते रुंदीकरण करण्याची आवश्यकता, यासाठी तात्काळ निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची कार्यवाही."

**(६) डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्य उत्पादन शुल्क विभागातील जवान संवर्गातील कर्मचा-यांवर प्रशासनाकडून अन्यायी भूमिका घेतली जात असणे, या संवर्गातील पदोन्नतीकरीता चुकीचे धोरण बनविण्यात येणे, जवानांना ८० टक्के तसेच लिपीकांना २० टक्के जागा दिल्या जात असणे, मात्र राज्यातील कोणत्याही शासकीय विभागात अशा प्रकारचे धोरण नसणे,पोलीस कारागृह, परिवहन या विभागांमध्येही गणवेशधारी पदावर लिपीकांना पदोन्नती दिली जात नसणे, असे असताना राज्य उत्पादन विभागात मात्र चुकीच्या पद्धतीने धोरण अवलंबिले

जात असणे, यासंदर्भात महाराष्ट्र राज्य जवान संवर्गीय कर्मचारी राज्य उत्पादन शुल्क विभाग या संघटनेने मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे दिनांक ९ जुलै, २०२५ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असणे, विभागीय परीक्षेतील लिपीकांच्या २० टक्के जागा वगळून तसा सुधारीत दुय्यम निरीक्षक सेवा प्रवेश नियम तयार करावा, सध्या चालु असणारी प्रक्रिया तात्पुरती स्थगित करावी, सुधारित दुय्यम निरीक्षक सेवा प्रवेश नियम बनविल्यानंतरच विभागीय परिक्षा घेण्यात यावी, या कर्मचा-यांच्या न्याय्य मागण्यांवर निर्णय घेण्यास हेतुपुरस्पर दिरंगाई, टाळाटाळ केली जात असल्याने, सदर प्रकरणी शासनाने हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

**(७) श्री.राजेश वानखडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नियोजन) यांचे लक्ष वेधतील :-**

"राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्मशताब्दी वर्षानिमित्त मोझरी विकास आराखडा, वैराग्यमूर्ति संत गाडगेबाबा वलगाव विकास आराखडा, रुक्मिणी माता श्री क्षेत्र कौडण्यापूर विकास आराखडा अंतर्गत शासनाद्वारे अनुक्रमे २०१५, २०१२ व २०१२ मध्ये मान्यता देणे, तीनही विकास आराखडे मिळून विकास कामे व इमारती निर्माण करण्याकरिता अंदाजे २०० कोटी रुपयांचा निधी खर्च करणे, यातील बहुतांश इमारती अर्धवट व निकृष्ट दर्जाच्या असणे, त्यामुळे बांधकाम झाल्यापासून अद्यापही याचे श्री. गुरुदेव सेवा आश्रम यांना हस्तांतरित करण्यास प्रशासनाला अपयश येणे, परिणामी या वास्तूंची देखभाल दुरुस्ती अभावी प्रचंड वाताहत होणे दुरावस्था होणे, यामध्ये एकात्मिक अध्यात्मिक शैक्षणिक संकुल, ग्रामविकास प्रबोधिनी विशेष अतिथी गृह व भक्तनिवास व अन्य इमारतींचा समावेश असणे,या इमारती वापरायोग्य नसल्यामुळे संपूर्ण आराखड्या द्वारे राष्ट्रसंतांचे कार्य प्रचार प्रसार करणे व भाविकांना सुविधा पुरवणे या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जाणे, या संपूर्ण बांधकामांची तातडीने दुरुस्ती करण्याची गरज निर्माण होणे, प्रचंड मोठ्या प्रमाणात शासन निधी खर्चून सुद्धा या वास्तूंच्या दुरवस्थेमुळे शासनाप्रती नागरिक, गावकरी व भाविकांमध्ये प्रचंड रोष निर्माण होऊन चीड उत्पन्न होणे, एकंदरीतच या विकास आराखड्याचा मूळ उद्देश सफल होण्याकरिता इमारतींच्या दुरुस्ती करिता निधी उपलब्ध करून देणे, या वर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्री. हेमंत रासने, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नियोजन) यांचे लक्ष वेधतील :-**

"पंढरपुर नगरपरिषदेमध्ये मागील १३६ वर्षांपासून मानवी मैला उचलणारी कुटुंबे असणे, सद्यस्थितीतही या कुटुंबातील व्यक्ती पंढरपुर नगरपरिषदे अंतर्गत मानवी मैला-विष्टा उचलण्याचे, सफाईच्या कामात असणे, जिल्हाधिकारी सोलापूर यांनी पंढरपुर तिर्थक्षेत्र विकास आराखड्या अंतर्गत या सफाई कर्मचाऱ्यांच्या कुटुंबासाठी गुजरात कॉलनी, पंढरपुर येथे ६०० चौ.फु ची घरे

बांधण्याचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी शासनास सादर केला असणे, सदर सफाई कामगारांच्या सदनिकांची संख्या, सदनिकेचे क्षेत्रफळ व त्याच्यावर होणारा अंदाजीत खर्च याबाबत राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. पी. पी. वावा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली असणे, पंढरपुर शहरातील सफाई कामगारांच्या सदनिकांबाबतचा प्रस्ताव नियोजन विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडे प्रलंबित असणे, सदर प्रस्तावाबाबत शासनाने तात्काळ निर्णय घेणे आवश्यक असणे, मागील १३६ वर्षांपासून मानवी मैला-विष्टा उचलण्याच्या सफाईच्या कामात असणाऱ्या कर्मचाऱ्यांना सामाजिक न्याय मिळणे आवश्यक असणे, यास्तव सदर विषयात कालबध्दतेने निर्णय घेणे आवश्यक असणे, याबाबत शासनाची भुमिका व करावयाची कार्यवाही."

**(९) ॲड. राहूल कुल, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सततच्या जलसिंचनामुळे चिबड जमिनींचे प्रमाण वाढले असल्याने चिबड जमिनी निर्मुलन करण्याची आवश्यकता असणे, पाझरचर, बंदिस्त पझारचर यासाठी मापदंड निश्चित करून पाझरचर निर्मुलनासाठी दौंड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे अंदाजपत्रके त्वरित तयार करून त्यास मान्यता देण्याची आवश्यकता, नदीक्षेत्रातील चिबड व क्षारपड जमिन सुधारणेकरीता १००% रक्कम अनुदान देण्याची मागणी, खडकवासला फुरसुंगी बोगदा प्रकल्पाची निविदाप्रक्रिया झाली असून, पर्यावरण मान्यतेअभावी काम सुरु झाले नसणे, उक्त काम तातडीने पूर्ण होण्याची आवश्यकता असणे, जनाई शिरसाई उपसासिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतरण, अस्तरीकरण निधीस मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली असून अद्याप काम सुरु नसणे, पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या कुपटेवाडी येथील वितरिकेच्या वरील बाजूस, वंचित जिरायती भागातील गावांच्या सिंचनासाठी नवीन पाईपलाईनसाठी अंदाजपत्रके तयार करण्यात येणे, त्यास निधीसह मान्यता मिळण्याची आवश्यकता असणे, दौंडच्या पूर्वभागातील अनेक गावांतील शेती उजनी धरणाच्या बॅकवॉटरवर अवलंबून असणे, त्याठिकाणी बॅरेजेस बांधण्याची मागणी असणे, मुळामुठा व भीमानदीवर कोपबंधाऱ्यांना अनेक वर्षांचा कालावधी झाला असल्याने त्यामधून पाण्याची गळती होत असल्याने, बंधाऱ्यांचे स्वयंचलित बॅरेजेसमध्ये रुपांतर करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करायची कार्यवाही व उपाययोजना."

**(१०) श्री.सिद्धार्थ खरात, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यटन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब यांनी छत्रपती शिवाजी महाराजांसारखे रत्न भारत भूला प्रदान करणे, छत्रपती शिवाजी महाराजांनी संत विचार व महाराष्ट्र धर्माच्या आधारे शिवराज्य स्थापन करणे, शिवाजी महाराजांनंतरही

मराठा साम्राज्य व मराठी पताका अटकेपार फडकणे, मात्र छत्रपती शिवाजी महाराजांच्या खऱ्या अर्थाने असलेल्या गुरू व मातोश्री यांचे पाचाड येथील समाधी स्थळी कोणत्याही सोयी सुविधा नसणे, समाधीस्थळ जवळील असलेली जागा ताब्यात घेऊन तिथे प्रशस्त हॉल, म्युझियम, ग्रंथालय, निवास व्यवस्था व इतर अनुषंगिक सोयीसुविधा करणे आवश्यक असणे, तसेच राष्ट्रमाता जिजाऊंचा पाचाड येथील राजवाडा अत्यंत भग्न अवस्थेत असणे, रायगड व रायगड परिसरात पर्यटन तीर्थस्थळ योजनेअंतर्गत निधी मंजूर असणे, मात्र यातून कोणतीही कामे या राजवाडा दुरुस्तीची न होणे, या निमित्ताने राष्ट्रमाता जिजाऊ जन्मस्थळ असलेले सिंदखेड राजा व समाधी स्थळ असलेले पाचाड येथील समाधी स्थळ व भग्न अवस्थेतील राजवाडा तात्काळ दुरुस्त करण्याची आवश्यकता, छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या अनुयायांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, यावर शासनाने करावयाची तातडीने कार्यवाही याबाबत शासनाची भूमिका."

**(११) सर्वश्री. अबू आझमी, रईस शेख, गजानन लवटे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई विद्यापीठ येथे महाराष्ट्र शासनातर्फे उर्दू घर स्थापन करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला असतानाही उर्दू घर बनवण्याबाबत कोणतीही कारवाई झालेली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, राज्यात अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना देण्यात येणारी फ्री मॅट्रिक शिष्यवृत्ती बंद करण्यात आलेली असून विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण जवळजवळ ५०% होणे, पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी फातिमा शेख शिष्यवृत्ती सुरु करण्यात यावी अशी मागणी करण्यात येणे, वक्फ बोर्डाचे मुख्यालय छत्रपती संभाजीनगर येथे असून या कार्यालयाला वर्षभरापासून कायमस्वरूपी सीईओ नसून सध्या प्रभारी सीईओंवर कामकाज सुरु असून ते सुद्धा नियमित येत नसल्याची बाब निदर्शनास येणे, वक्फ बोर्डाचे कायमस्वरूपी सीईओ नियुक्त करण्याची मागणी करण्यात येणे, राज्याच्या हज कमिटी करीता मुंबई मध्ये मुख्य कार्यालय करिता स्वतःची जागा नसल्याने हज कमिटी कार्यालय नसणे, अल्पसंख्याक योजने अंतर्गत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता एमपीएससी, पोलीस भरती व अन्य स्पर्धा परीक्षेच्या प्रशिक्षणार्थ इस्माईल युसुफ कॉलेज येथे प्रशिक्षण केंद्र उभारण्यात यावे, राज्यातून मुंबईमध्ये शिक्षणाकरिता येणाऱ्या अल्पसंख्यांक विद्यार्थिनी करीता कोणतेही वसतीगृह नसल्याने इस्माईल युसूफ कॉलेज येथील २५ एक्कर जागेमध्ये अल्पसंख्याक महिला वसतीगृह बनविण्याची मागणी करण्यात येणे, सदर विषयी शासनातर्फे करण्यात आलेली वा येत असलेली कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रीया."

**(१२) श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सोलापूर जिल्ह्यात अक्कलकोट तालुक्यातील महाराष्ट्र परिवहन मंडळाचे भव्य बस स्थानक उभारणीचे काम सुरू असून त्याच्या संरक्षक भिंतीला मा. परिवहन मंत्र्यांनी गेट सोडण्याबाबतचे आदेश दिले असल्याबाबतची बाब माहे जूनच्या पहिल्या आठवड्यात वर्तमान पत्राद्वारे समोर आली असणे, त्यानुसार याबाबत काय निकष लावण्यात आलेले आहेत याची माहिती सदर करण्याची आवश्यकता, बस स्थानकाच्या बाजूला एक सलग मोठा रस्ता रहदारीसाठी असून, नवीन गेट बस स्थानकाच्या संरक्षक भिंती मधून काढण्याचे कारण अद्याप समोर न येणे, याकडे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक : प्रश्नोत्तरे**

**(अ) तारांकित प्रश्न**

**(ब) अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक १ ते ८ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**(क) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**वैद्यकीय शिक्षण मंत्री** : "मुंबईत बनावट पदवी प्रमाणपत्र घेतलेल्या डॉक्टरांचे परवाने रद्द करणेबाबत" या विषयावरील श्री. बाळासाहेब थोरात व इतर वि.स.स यांचा दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ७२६८६ च्या अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **उप मुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री** : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (२) | **उद्योग मंत्री** | : | **(क)** | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षांचा अनुक्रमे साठावा व एकसष्ठावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | **(ख)** | मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, छत्रपती संभाजीनगर यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा सत्तावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| (३) | **महिला व बाल विकास मंत्री** | : | | महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांचे सन २०१९-२०२० ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| (४) | **कृषी मंत्री** | : | **(क)** | डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी यांचे सन २०१९-२०२० या वर्षाचे वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | **(ख)** | वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| (५) | **रोजगार हमी योजना मंत्री** | : | | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र व राज्य रोजगार हमी योजना यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : औचित्याचे मुद्दे**

**पाच : अशासकीय सदस्यांची विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.**

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(बुधवार, दिनांक १६ जुलै, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)**

(१) **श्री.अतुल भोसले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गाच्या सहापदरीकरणाच्या कामामुळे कराड शहरालगत उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात असणे, मात्र कामाच्या

दिरंगाईमुळे महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी, रुंदीकरणाच्या कामामुळे जागोजागी खोदकाम, महामार्गालगत मोठमोठे खड्डे, सुरक्षा रेलिंगचा अभाव, साईडपट्टीवर दगडांची मांडणी, अनावश्यक ठिकाणी बॅरिकेटस, ब्लिंकर्स, सबलर, इंडिकेटर्सची कमतरता, धोकादायक ठिकाणी फलकांचा अभाव, उपमार्गावर खड्याचे साम्राज्य, साचलेल्या पाणी, चिखलामुळे होणारी घसरण यामुळे प्रवाशांच्या जीवावर बेतणे, गत चार महिन्यापासून महामार्गावर तब्बल २२ अपघातामध्ये ७ जणांनी जीव गमावणे, सोळापेक्षा जास्त गंभीर जखमी होणे, सातारा ते कोल्हापूर ह्या १२० कि.मी.च्या प्रवासास साडेतीन तासांपेक्षा जास्त वेळ लागणे, एकाचवेळी सर्व ठिकाणी ही कामे केली जात असल्याने धोकादायक परिस्थिती निर्माण झाल्यामुळे अपघातांमध्येही दिवसेंदिवस होणारी वाढ थांबविण्यासाठी वाहतूक नियंत्रणासाठी अधिक कर्मचारी, योग्य दिशादर्शक फलक, अपघात टाळण्यासाठी स्पीड ब्रेकर, पथदिवे उभारणी करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) डॉ. राहूल पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"शेतक-यांना दिवसा वीज पुरवठा व्हावा यासाठी राज्य शासनाने "मागेल त्याला सोलार पंप योजना" सुरु करणे, सदर योजनेंतर्गत परभणी जिल्ह्यातील २५,९६१ शेतकऱ्यांनी अर्ज करुन पैसे भरलेले असतांना आतापर्यंत केवळ ४,७६१ शेतकऱ्यांनाच सौर पंप वितरित करण्यात येणे, उर्वरीत शेतकरी पैसे भरुनही गेल्या ६ महिन्यापासून सौर कृषी पंपापासून वंचित असणे, उक्त योजनेंतर्गत निश्चित कालमर्यादेत सौर पंपांचे वितरण करण्याबाबत शासनाचे स्पष्ट आदेश असतांनाही प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे सदर योजनेंतर्गत शेतक-यांना सौर कृषीपंप मिळण्यास होत असलेला विलंब, परिणामी शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असणे, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन उक्त योजनेच्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष करीत पैसे भरुनही जिल्ह्यातील शेतक-यांना सौर कृषी पंपाचे वितरण न करणा-या दोषी अधिका-यांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी विविध पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे माहे जून, २०२५ मध्ये लेखी निवेदनाव्दारे केलेली असणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने चौकशी करुन निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

**(३) श्री.विलास तरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पालघर जिल्ह्यातील बोईसर विधानसभा क्षेत्रात पालघर व वसई तालुक्यासह ग्रामीण भागात वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने

वाड्या - वस्तीतील आदिवासी, ग्रामस्थांना, शहरातील नागरिकांना रात्र अंधारात काढावी लागणे, सदर पालघर व वसई तालुक्यातील नागरिकांनी तालुका उपविभागीय वीज कार्यालयाकडे (सफाळे, सावरखंड फिडर) विजेच्या तक्रारीची दखल घेऊन तातडीने दुरुस्तीची कामे हाती घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०२५ वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास येणे, गांजे - ढेकाळे येथ उप केंद्राच्या जागेकरीता जलसंपदा विभागाकडून भाडे तत्वासाठी लाखो रुपये भाडे आकारणे, उक्त भागात गावातील वीज - वाहिन्या अत्यंत जीर्ण झाल्याने तुटत असणे, ट्रान्सफॉर्मरमध्ये दोष निर्माण होणे, वीज गेल्यावर नागरिकांनी महावितरणचे संबंधित अधिकारी-कर्मचारी तक्रारीची वेळीच दखल घेत नसल्याने वाड्या-वस्तीतील ग्रामस्थांना रात्र अंधारात काढावी लागणे, परिणामी पालघर व वसई तालुक्यातील ग्रामीण भागासह शहरी भागात शेतकऱ्यांच्या कृषिपंपांना वीज पुरवठा वारंवार खंडित होण्यामुळे शेतीच्या कामात अडचणी निर्माण होणे, हजारो वीज ग्राहकांना वीज पुरवठा सुविधा पुरविण्यात महावितरण कंपनीने दुर्लक्ष केल्याने शेतकऱ्यांमध्ये तसेच नागरिकांमध्ये संतापाची, चिडीची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने गंभीर दखल घेऊन दुरुस्तीची कामे मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्री.संजय उपाध्याय, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"दिनांक ९ जून, २०२५ रोजी बदलापुर (पश्चिम) पोलीस ठाणे येथील सहायक पोलीस निरीक्षक, श्री. योगेश बेंडकुळे हे अंबरनाथ येथील दर्गा मोहल्याच्या ठिकाणी पाहणीस गेले असणे, सदर मोहल्याच्या एका घरात बंदीस्त शेडमध्ये जनावरांची कत्तल होत असल्याची खबर त्यांना मिळाली असणे, त्यानुसार त्यांनी परिसराची पाहणी केली असता कैफ मन्सुर शेख यांच्या घराच्या बाजुला असलेल्या पत्रा शेडमध्ये प्राण्यांची कत्तल झाली असल्याचे त्यांना आढळले असणे, सदर मांसाचे परिक्षण केले असता पशुवैद्यकीय अधिकारी यांनी सदर मांस हे गोमांस असल्याचे निरीक्षण नोंदविले असणे, त्यानुसार दिनांक ९ जून, २०२५ रोजी बदलापूर (पश्चिम), पोलीस ठाणे येथे FIR क्र. ०२२४/२०२५ नोंदविण्यात आली असणे, सदर FIR मध्ये कैफ मन्सुर शेख, कैश मन्सुर शेख, उदरी ऊर्फ सैफ मन्सुर शेख हे संशयित आरोपी असणे, सदर आरोपी हे वारंवार गोहत्या करीत असल्याचे निदर्शनास आले असणे. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात गोवंश हत्या होत असल्याचे निदर्शनास येत असणे, त्यामुळे अशा वारंवार गुन्हा करणाऱ्या आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करणे अपेक्षित असणे, तसेच महाराष्ट्र प्राणी संवर्धन कायदा १९७६ व सुधारणा २०१५ व इतर कायद्याअंतर्गत कठोर कारवाई करण्याबाबत शासनाची भुमिका व उपाययोजना."

**(५) श्री.चंद्रकांत पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"दिनांक २३ फेब्रुवारी, २०२५ रोजी जळगाव जिल्ह्यातील शहर पोलीस ठाण्याद्वारे शाहूनगर, जळगाव येथे राहणाऱ्या सर्फराज जावेद भिस्ती याच्या घरी छापा टाकून ५३ ग्रॅम ७५ मिलीग्रॅम एमडी (नशीली पदार्थ) जप्त करण्यात येणे, सदर आरोपी हा कुख्यात गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला असून त्याच्याशी जिल्ह्यातील महत्वाच्या स्थानिक गुन्हे शाखेचे एपीआय श्री. पोटे यांचे संबंध असल्याचे उघडकीस येणे, परिणामी संबंधित अधिकाऱ्याला निलंबित करण्यात येणे, विशेष म्हणजे ज्या गुन्हे शाखेचे हे अधिकारी आहेत त्या शाखेचे तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री.बबन आव्हाड हे यापूर्वी भुसावळ येथे कार्यरत असताना देखील अशाच स्वरूपाच्या घटना घडलेल्या असणे, त्यांच्या कार्यकाळात गुटखा तस्करी, गुराढोरांची तस्करी, व इतर गंभीर गुन्ह्यांना पोलिस खात्यातील काही अधिकाऱ्यांचे सक्रिय समर्थन मिळाले असणे, अशा पार्श्वभूमीवर श्री. बबन आव्हाड यांची कोणतीही चौकशी न होणे हे आश्चर्यकारक असणे, जळगाव जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या गंभीर स्थितीचा विचार करता, व अशा घटना गुन्हेगारांना पोलिस खात्यातून संरक्षण मिळत असल्याचा स्पष्ट संकेत देत असल्याने, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करुन, जिल्ह्यातील बिघडलेल्या कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न तातडीने निकाली काढण्याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.."

**(६) डॉ. किरण लहामटे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अकोले तालुक्यातील घोटी येथील दत्तात्रय कवटे हा सांगली जिल्ह्यातील तासगाव (योगेशवाडी) येथील पोल्ट्री व्यावसायिक सचिन सांळुके यांच्याकडे अनेक दिवसांपासून कामाला असणे, परंतु दिनांक १४ मार्च, २०२५ रोजी सांळुके यांनी दत्तात्रय साडीने गळफास लावून मृत झाला असे कळविले असणे, तथापि मृतदेह ताब्यात देण्यासाठी घाई करण्यात येणे, परंतु यानंतर मृतदेहाच्या हातावर व मानेवर धारदार शस्त्राने कापल्याच्या खुणा असल्याचा आरोप त्यांच्या नातेवाईकांने केलेला असणे, परंतु असे असतांना, गेल्या तीन महिन्यापासून या प्रकरणाची चौकशी करण्यांत आलेली नसल्याचे निदर्शनास आलेले असणे, त्यामुळे गावकऱ्यांनी सदर प्रकरणाची चौकशी करण्यांत येऊन दोषीविरुध्द कारवाई करण्यांत यावी याबाबतचे निवेदन मा.जिल्हाधिकारी, संबंधित पोलीस विभाग यांना देण्यांत आलेली असणे, परंतु कारवाई करण्यांत येत नसल्यामुळे त्याबाबत ग्रामसभा घेऊन गावकऱ्यांनी उपोषण केलेले असणे, त्याशिवाय याबाबत मा. लोकप्रतिनिधी यांनी देखील दिनांक ६ जुलै, २०२५ रोजीच्या मा.मुख्यमंत्री यांना त्याबाबतचे निवेदन देण्यांत आलेले असणे,

परिणामी सदर प्रकरणाची चौकशीच होत नसल्यामुळे चौकशी न होण्याची कारणे काय, असाही प्रश्न निर्माण होणे, त्यामुळे सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषीविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(७) श्री. अमित साटम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"अतिरिक्त महापालिका आयुक्तांनी (शहर) घेतलेल्या मनमानी आणि एकतर्फी निर्णयांबद्दल, महापालिकेच्या स्थापित धोरणांच्या विरोधात असणे, विशेषतः हे मुंबई शहरातील ए वार्डमधील लायन गेट, ओव्हल मैदान आणि विधान भवन इत्यादी पाच प्रमुख ठिकाणी १४ 'ॲस्पिरेशनल शौचालये' बांधण्यात येणे, प्रत्येक शौचालयाची अंदाजे किंमत १.२५ कोटी ते १.७५ कोटी रुपये असणे, परंतु या बांधकामांमुळे पादचाऱ्यांच्या ये-जा मार्गात अडथळा निर्माण होऊन BMC च्या 'पादचारी प्रथम' धोरणाचे उल्लंघन होणे, अतिरिक्त आयुक्त (शहर) यांनी त्यांच्या अधिकारांच्या मर्यादांचे उल्लंघन करून 'पादचारी प्रथम' या धोरणाचे उल्लंघन केलेले असणे, सार्वजनिक सुविधांचे बांधकाम करताना देखील, पादचाऱ्यांच्या हालचालीसाठी किमान स्पष्ट रुंदी राखली जावी असे धोरण असताना देखील सदर प्रकरणात उपरोल्लेखित बांधकामांमुळे कुलाबा आणि दक्षिण मुंबईच्या रहदारीची वर्दळ असलेल्या भागांतील महत्त्वाचे पादचारी मार्ग अवरोधित होणे, शहराच्या शतकानुशतके जुन्या असणाऱ्या सौदर्यपूर्ण वारसा इमारतींना बाधित करून शहराला विद्रूप करणाऱ्या बांधकामांऐवजी महापालिकेने युरोपियन शैलीतील फिरत्या शौचालयांसारख्या आधुनिक, कार्यक्षम आणि वाजवी खर्चात बनू शकतील अशा पर्यायांचा शोध घेण्याची आवश्यकता, अशा फिरत्या शौचालयांच्या एका युनिटची किंमत फक्त २-५ लाख रुपये असून ती जगभरात मोठ्या प्रमाणावर वापरली जात असणे, सार्वजनिक सुरक्षा आणि सार्वजनिक निधीचे संरक्षण करण्यासाठी योग्य कारवाई होण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) डॉ. विजयकुमार गावित, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जमीन घोटाळा प्रकरणासंबंधी प्राप्त तक्रारीनुसार नंदुरबार येथील रेल्वे स्टेशन रोडवरील महसूल विभागाच्या जुन्या इमारतीवर महसूल विभागाने छापा टाकून झडती घेणे, सदर झडतीत उक्त कार्यालयातील निवृत्त मंडळ अधिकारी परवानगीविना कार्यालयात बसून जमिनीच्या नोंदी घेत असल्याचे आढळून येणे, सदर नोंदींमध्ये तलाठी व मंडळ अधिकारी, नंदुरबार यांचे कार्यालयाशी संबंधित कागदपत्रे आढळून येणे, याप्रकरणी

७०० पेक्षा अधिक फाईल्स आणि हजारो कागदपत्रे जप्त करण्यात येणे, तसेच अनेक विवादास्पद आदेशांच्या सह्या असलेली व सह्या नसलेली कागदपत्रे आणि महागड्या वस्तूंची माहिती निदर्शनास येणे, निवृत्त मंडळ अधिकारी हे जवळपास दोन वर्षांच्या कालावधीपर्यंत महसूल विभागाच्या जुन्या इमारतीत कोणताही अधिकार नसताना विविध शासकीय दस्तावेज आणि अभिलेख स्वत:च्या ताब्यात ठेवून शासनाची व जनतेची दिशाभूल व फसवणूक करीत असल्याचे आढळून येणे, सदर प्रकरणी संबंधित निवृत्त मंडळ अधिकाऱ्यांवर दिनांक २५ जून, २०२५ रोजी नंदुरबार पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल होणे, सदर प्रकरणाशी संबंधित सर्व अधिकाऱ्यांवर आवश्यक ती कारवाई होण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

**(९) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर येथील इस्टेट इन्व्हेंसमेंट कंपनी प्रा. लि. या कंपनीकडे सुमारे ८९९४.६८ एकर सरकारी जमीन बेकायदेशीररित्या हस्तांतरीत केल्याबद्दल जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द व कंपनीच्या अनियमिततेच्या तसेच कंपनीच्या मालकीच्या जमिनीची विधी ग्राह्यता तपासणीकामी अप्पर आयुक्त, कोकण यांची एक सदस्यीय समिती नेमण्यात येईल तसेच कायद्यात दुरुस्तीची गरज भासल्यास पुढील विधानसभेच्या अधिवेशनापुर्वी तशी सुधारणा केली जाईल". असे आश्वासन देण्यात येणे, या अनुषंगाने दि. १० जानेवारी २०२४ रोजी श्री. विकास पानसरे, अप्पर आयुक्त कोकण, महसुल विभाग यांची या कामी एकसदस्यीय समिती नेमण्यात येणे, या समितीने कंपनी आणि ठाणे कलेक्टरच्या संपूर्ण घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी सुमारे ८ महिन्यांचा कालावधी घेऊन ऑगस्ट, २०२४ मध्ये शासनास त्याचा अहवाल सादर करणे, परंतु अनेक वर्षे उलटून गेले असूनही सरकारने अद्यापपर्यंत कोणताही बदल किंवा कार्यवाही केल्याचे दिसत नसणे विधानसभेत या मुद्याची चर्चा झाल्यानंतर कंपनीने आपला 'लिज होल्ड' हक्क सोडण्यासाठी नागरिकांकडून आकारले जाणारे शुल्क वाढवून मोठ्या प्रमाणात रोकड रक्कम स्विकारत असल्याची माहिती माहे जून २०२५ च्या दरम्यान उघड होणे, यासंदर्भात विधानसभेत आदेश देऊनही मा. मंत्री महोदय यांच्या दालनात बैठक होऊनही कोणतीच कारवाई न करण्यात येणे, याबाबत राज्य शासनाने सखोल चौकशी करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(१०) श्री. गोपिचंद पडळकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील सरळसेवा शिक्षक भरती संवर्गातील बिंदूनामावली मधील तपासणीमध्ये भटक्या जमाती विशेषत: NT-C तसेच VJNT/ OBC/ SBC/SC/ST प्रवर्गावर झालेला अन्याय दूर करून शिक्षक संवर्गाच्या

बिंदूनामावली फेरदुरुस्तीचे आदेश देऊन मागासवर्गियांचा अनुशेष काढून भरती प्रक्रिया राबविणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे मे, २०२५ मध्ये करण्यात आली असणे, याप्रकरणी यापूर्वीही अनेकवेळा शासनाकडे मागणी करुनही कोणतीही कार्यवाही झाली नसणे, राज्यातील शिक्षक भरती सन २०२२ मध्ये जागा उपलब्ध नसून भटक्या जमाती प्रवर्गालाही प्रचलित आरक्षणानुसार जागा उपलब्ध नसल्यामुळे इतर प्रवर्गावर अन्याय होत असणे, तसेच मागासवर्गीय कर्मचारी गुणवत्तेने खुल्या प्रवर्गाच्या कट ऑफ ला सन १९९० पासून ते सन २००४ पर्यंत लागूनही बिंदू बदल करून जातीच्या आरक्षण बिंदू वर दर्शविण्यात आले असल्यामुळे मागास प्रवर्गावर अन्याय झाला असणे, सरळसेवा भरती प्रक्रिया शासन नियमाप्रमाणे राबविली जात नसल्यामुळे मागासप्रवर्गाचा अनुशेष निघत नसणे, सन २००५ ला आरक्षण कायदा आल्यानंतर कर्मचारी आदेशावर निवड प्रवर्ग लिहण्याची पद्धत आली, या सर्व बाबीमुळे मागासवर्गीयांचे आरक्षण अनुशेष निघत नसणे, त्यामुळे बिंदूनामावली तपासणी करताना निवडसूची शिवाय दुसरा पुरावा ग्राह्य धरू नये, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली असणे, त्यानुषंगाने राज्यातील शिक्षक भरती संवर्गातील बिंदूनामावलीमध्ये भटक्या जमाती प्रवर्गावर झालेल्या अन्याय दूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(११) श्री. काशिनाथ दाते, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"ग्रामविकास विभागाअंतर्गत लेखाशीर्ष २५१५ १२३८ या योजनेअंतर्गत दिनांक ३ ऑक्टोबर, २०२४ रोजी शासन निर्णय क्र.विकास २०२४ प्र.क्र.२४९/ योजना ६ याद्वारे अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर, नगर, नेवासा व श्रीगोंदा या तालुक्यातील विकास कामासाठी एकूण ६ कोटी ९५ लक्ष रकमेच्या ४५ कामास प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, मात्र ४ एप्रिल २०२५ रोजी ग्रामविकास विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाला सदर शासन निर्णय बनावट असल्याचे व संबंधित विरोधात गुन्हा दाखल करण्याचे पत्र पाठविणे, सार्वजनिक बांधकाम विभागाने या सहा महिन्यात संबंधित शासन निर्णय खरा आहे की खोटा याची खात्री न करता निविदा प्रक्रिया राबवून सदर कामांना कार्यारंभ आदेश देऊन कामे सुरू करणे, या बनावट आदेशातील ४५ कामांपैकी २.५५ कोटींची १८ कामे पूर्ण झालेली असणे, २०.४९ लाख खर्चाची सात कामे २५ ते ३० टक्के पर्यंत झालेली असणे, मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणतीही माहिती न घेता सदरच्या कामांना मान्यता देणे, याबाबत सहा महिन्यानंतर सार्वजनिक बांधकामा विभागाकडून ठेकेदारावर गुन्हा नोंदवण्यात येणे, अशाप्रकारे

ठेकेदारांनी व अधिकाऱ्यांनी शासनाची केलेली लूट व फसवणूक, प्रशासनात विशेषत: मंत्रालयात लोकप्रतिनिधी पेक्षा ठेकेदारांचे वर्चस्व वाढत असल्याचे जनमानसात निर्माण झालेले मत, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून संबंधित दोषी असणाऱ्यांच्या विरोधात करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

**(१२) श्री. रविशेठ पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात अवकाळी पावसाने खारेपाट येथील भात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असल्याची बाब माहे जुन, २०२५ च्या दरम्यान निदर्शनास येणे, सदर नुकसानीचे पंचनामे अद्याप झालेले नसणे, त्यामुळे खारेपाट व दादर गावातील शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला असणे व त्यांच्यामध्ये प्रचंड रोष निर्माण होणे, सदर अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या खारेपाट व दादर गावातील शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१३) श्री. सुभाष देशमुख, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सोलापूर जिल्ह्यातील फताटेवाडी येथील एनटीसीपी औष्णिक उर्जेच्या प्रकल्पासाठी जमीन दिलेल्या शेतकरी कुटुंबातील श्री. मिथुन धनु राठोड (वय वर्षे ४०) या तरुण शेतकऱ्याने नुकतीच आत्महत्या केली असणे, या प्रकल्पात गेलेल्या जमीनीस वाढीव मोबदला मिळण्यास होणारा विलंब व कंत्राटी नोकरीसाठी आलेले अपयश हे आत्महत्येचे कारण असणे, त्यामुळे या शेतकरी युवकांने टोकाचे पाऊल उचलले असणे, त्यामुळे त्याचा परिणाम त्यांच्या कुटुंबावर झालेला असणे, याबाबत राठोड कुटुंबीय व ग्रामस्थांनी एनटीसीपीच्या गेटवर आंदोलन केलेले असणे, या आंदोलनाची तात्काळ दखल घेऊन मृत शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना व त्यांच्या वारसांना प्रकल्पासाठी दिलेल्या जमिनीचा वाढीव मोबदला आणि कंत्राटी नोकरी देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

**सात : शासकीय विधेयक :-**

**विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(क)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२५

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, अमित झनक, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री.साजिद पठाण, रामदास मसराम व हेमंत ओगले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**आठ : (बुधवार, दिनांक १६ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, अर्जुन खोतकर, अब्दुल सत्तार, सुधीर मुनगंटीवार, दिलीप वळसे-पाटील, दिपक केसरकर, सुरेश धस, धनंजय मुंडे, रमेश बोरनारे, प्रशांत बंब, संजय बनसोडे, राजेंद्र गावित, संभाजी निलंगेकर-पाटील, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री चेतन तुपे, नारायण कुचे, शांताराम मोरे, शेखर निकम, बबनराव लोणीकर, किशोर पाटील, प्रकाश सोळंके, अभिमन्यू पवार, निलेश राणे, महेश शिंदे, गोपीचंद पडळकर, अनिल पाटील, चंद्रदिप नरके, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री संजय गायकवाड, राजकुमार बडोले, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री नरेंद्र भोंडेकर, चंद्रकांत सोनवणे, सर्वश्रीमती श्वेता महाले, मंजुळा गावित, श्री. प्रताप पाटील-चिखलीकर, डॉ.संजय कुटे, श्री. राजेश क्षिरसागर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री प्रकाश भारसाकळे, महेंद्र दळवी, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री हरिष पिंपळे, महेंद्र थोरवे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री प्रवीण दटके, किरण सामंत, दिलीप बनकर, देवराव भोंगळे, संतोष बांगर, बालाजी कल्याणकर, डॉ.किरण लहामटे, श्रीमती सीमाताई हिरे, सर्वश्री चंद्रकांत पाटील, विलास तरे, हिरामण खोसकर, रमेश कराड, अमोल पाटील, चंद्रकांत नवघरे, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री सुहास कांदे, अमोल खताळ, डॉ. तुषार राठोड, सर्वश्री विठ्ठल लंघे, राजेश पवार, बाबुराव कदम-कोहळीकर, आनंद तिडके, राणाजगजितसिंह पाटील, हिकमत उढाण, राजेंद्र यड्रावकर-पाटील, विक्रम पाचपुते, राजेश मोरे, विजय शिवतारे, ॲड. राहुल कुल, डॉ.तानाजी सावंत, श्री. सुहास बाबर,**

**डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री सत्यजित देशमुख, शंकर मांडेकर, सुभाष देशमुख, अनुपभैय्या अग्रवाल, काशिराम पावरा, विजय देशमुख, दिलीप बोरसे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री महेश लांडगे, मंगेश चव्हाण, प्रताप अडसड, प्रविण तायडे, राजू तोडसाम, समीर कुणावार, राजेश वानखडे, राजेश बकाने, विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, किशोर जोरगेवार, डॉ. मिलिंद नरोटे, श्रीमती सई डहाके, सर्वश्री श्याम खोडे, आमश्या पाडवी, श्रीमती रंजनाताई जाधव, सर्वश्री शरद सोनवणे, उमेश यावलकर, किसन वानखेडे, कृष्णा खोपडे, किर्तीकुमार भांगडिया, तान्हाजी मुटकुळे, श्रीमती अनुराधा चव्हाण, ॲड.श्रीजया चव्हाण, सर्वश्री जितेश अंतापुरकर, करण देवतळे, चरणसिंग ठाकूर, सुधीर गाडगीळ, अमल महाडिक, हेमंत रासने, सुनिल कांबळे, मनोज घोरपडे, सचिन कल्याण-शेट्टी, शंकर जगताप, राजेश पाडवी, डॉ. आशिष देशमुख, श्री. राघवेंद्र पाटील, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री चैनसुख संचेती, केवलराम काळे, संजय पुराम, समीर मेघे, संतोष दानवे, भिमराव तापकीर, भिमराव केराम, अमोल जावळे, रत्नाकर गुट्टे, सिध्दार्थ शिरोळे, राहुल आवाडे, देवेंद्र कोठे, डॉ. विजयकुमार गावित, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री मोहन मते, किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, शिवाजी पाटील, काशिनाथ दाते, विजयसिंह पंडित, ज्ञानेश्वर कटके, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र केंद्रस्थानी ठेऊन राज्यात सिंचन क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्याचा शासनाचा प्रयत्न असणे, कृषी क्षेत्रात कृत्रिम बुध्दिमता (ए-आय) तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे धोरण अंमलात आले असणे, जलयुक्त शिवार योजना, नदीजोड प्रकल्प आणि रखडलेल्या सिंचन योजनांच्या माध्यमातून कृषी सिंचन वाढविण्यावर भर देण्यात आला असणे, विदर्भातील वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यास १० लाख एकर जमिन ओलिताखाली येण्याची शक्यता असणे, नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पामुळे नाशिक व जळगाव जिल्ह्यातील ४९,५१६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार असणे, दमणगंगा-एकदरे-गोदावरी या २३०० कोटी रुपये किंमतीच्या नदीजोड प्रकल्पामुळे ३.५५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असणे, तापी महापुनर्भरण या १९,३०० कोटी रुपये किंमतीच्या सिंचन प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम विदर्भातील खारपाण पट्ट्यातील शेतकऱ्यांना लाभ होणार असणे, महाकृषी विकास अभियान अंतर्गत केवळ १ रुपयात राबविण्यात येणाऱ्या पिक विमा योजनेत नियमितता ठेवण्याच्या दृष्टीने कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिक सतर्क होण्याची आवश्यकता, अटल भूजल योजना अधिक गतीमान करण्याची आवश्यकता, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ ला मंत्रिमंडळाची मान्यता मिळणे, कोकणातील उल्हास आणि वैतरणा नद्यांच्या खोऱ्यातून ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रकल्प प्रस्तावित असणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे पांदण रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पांदण रस्ते योजना" अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, राज्यात सन २०२४-२०२५ च्या हंगामांतर्गत सोयाबीन, तूर, ज्वारी,

चना, कापूस इ. धान खरेदी झाली असणे, शासकीय खरेदी योजनेतील अनियमितता टाळण्यासाठी योजना सक्षम करण्याची आवश्यकता, राज्यात काही गावांतील शेतकऱ्यांना डिजिटल पध्दतीने देण्यात येणारे लाभ मिळण्यात असलेल्या अडचणी दूर करण्याची आवश्यकता, 'मॅगनेट २.०' अंतर्गत कृषी व्यवसायाला चालना देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्यात आली असणे, ऊर्जा वापराला प्रोत्साहन देतानाच ऊर्जा निर्मितीवर भर देण्यात येत असणे, १६००० मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्याचे धोरण आखण्यात येणे जेणेकरुन, शाश्वत व स्वच्छ ऊर्जा मिळेल आणि औद्योगिक क्षेत्राला त्याचा फायदा होईल, राज्यातील सर्व शासकीय इमारती सन २०२५ या वर्षाच्या अखेरपर्यंत संपूर्णपणे सौरऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे धोरण असणे, शेतक-यांना सिंचनासाठी सौर कृषीपंप उपलब्ध करून देणारी "मुख्यमंत्री सौर कृषी योजना" राज्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असणे, सौर ऊर्जेचा वापर वाढवून शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे उद्दिष्ट असणे, महाराष्ट्र देशासाठी रोल मॉडेल व्हावे व राज्यातील शेतकरी सुजलाम-सुफलाम व्हावा यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

नऊ : **(बुधवार, दिनांक १६ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री अजय चौधरी, रोहित पाटील, डॉ. बाबासाहेब देशमुख, सर्वश्री अमीन पटेल, दिलीप सोपल, रोहित पवार, अमित देशमुख, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री उत्तमराव जानकर, अस्लम शेख, कैलास घाडगे-पाटील, संदिप क्षिरसागर, डॉ.विश्वजीत कदम, सर्वश्री सुनिल राऊत, बापूसाहेब पठारे, अमित झनक, संजय पोतनीस, नारायण पाटील, विकास ठाकरे, नितीन देशमुख, अभिजीत पाटील, शिरीषकुमार नाईक, वरुण सरदेसाई, राजु खरे, संजय मेश्राम, अनंत (बाळा) नर, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री साजिद खान पठाण, हारुन खान, हेमंत ओगले, महेश सावंत, रामदास मसराम, प्रविण स्वामी, अनिल मांगुळकर, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव:- (मंत्र्यांचे उत्तर)**

"मागील काही वर्षापासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका न झाल्याने या संस्थांवर प्रशासकाचे नियंत्रण असणे, त्यामुळे राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती या अंतर्गत येणाऱ्या शहरी भागात पायाभुत सुविधांचा बोजवारा उडाला असणे, लोकप्रतिनिधींचा वचक नसल्यामुळे मनमानीपणे कारभार सुरु असणे, त्यामुळे या मध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार व भ्रष्टाचार होत असल्याची प्रकरणे उघडकीस येणे, स्थानिक स्वराज्य संस्थांना योग्य मोबदला मिळत नसल्याने विकासाची अनेक कामे रखडलेली असणे, रस्त्याच्या कामात मोठ्या प्रमाणात निविदांची रक्कम वाढविल्यामुळे कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार होऊन सदरची कामे निकृष्ट दर्जाची झाली असणे, शहरी भागात प्रदुषणाने विळखा घातला असून धुळीचे साम्राज्य, कचऱ्याचे ढिग, नवीन बांधकामे होत

असताना त्यातून निघणारे डेब्रिज, प्लास्टिक पिशव्यांचा मोठ्या प्रमाणात वापर त्यामुळे शहरी भागात पर्यावरणाचा झालेला ऱ्हास, शहरी भागात डंपिंग ग्राऊंडमुळे निर्माण झालेला प्रश्न, डंपिंग ग्राऊडसाठी जागा उपलब्ध नसणे, झोपडपट्टयांचा पुनर्विकास करण्यास होत असलेला विलंब, जुन्या व धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाबाबत रखडलेली प्रकरणे, पावसाळ्यापुर्वी करण्यात येणाऱ्या नालेसफाईमध्ये होत असलेला भ्रष्टाचार, महानगरपालिका अंतर्गत रुग्णालयातील रिक्त पदांमुळे व अद्ययावत उपकरणांअभावी रुग्णांना उपचार देण्यात येणा-या अडचणी, स्मार्ट सिटी प्रकल्पाबाबत शासनाने दाखविलेल्या उदासिनतेमुळे अनेक प्रकल्प रखडलेले असणे, मुंबई महापालिकेच्या के/पश्चिम वॉर्डातील जुहूतारा रोड येथील "सो हो हाऊस" या पंचतारांकित हॉटेलचे बांधकाम करतांना कोस्टल रेग्युलेशनचे झालेले उल्लंघन, २ चटईक्षेत्र निर्देशांक मिळत असतांना २.५ जास्त चटई क्षेत्र देऊन दिलेले भोगवटा प्रमाणपत्र, सदर हॉटेलमध्ये मोठ्या प्रमाणात झालेले अनधिकृत बांधकाम, स्थानिक नगरसेवकांनी महानगरपालिकेकडे केलेल्या तक्रारी, माजिवडे (जि. ठाणे) येथील कांदळवन-तिवरे नष्ट करुन रुस्तमजी अर्बेनिया या इमारतीचे झालेले बांधकाम, पर्यावरण कायद्यांचे झालेले उल्लंघन, या इमारतींसमोर अशाच प्रकारचे झालेले अनधिकृत बांधकाम, मुंबईतील वांद्रे (पूर्व) विभागातील रखडलेले पुनर्विकास प्रकल्प, परभणी नगरविकास विभागाच्या अमृत-२ अभियान योजनेंतर्गत येलदरी समांतर पाणी पुरवठा योजना, भुयारी गटार योजना, डंपिंग ग्राउंड, डिगी नाला खोलीकरण व रुंदीकरण, भिमनगर येथील अंडरपास रस्ता आणि महापालिका क्षेत्रात नवीन नाट्यगृह बांधणे या विकास कामांच्या प्रस्तावास जुलै, २०२२ ते जानेवारी, २०२३ दरम्यान राज्यस्तरीय उच्चधिकार समितीने दिलेली मान्यता, सदर प्रस्ताव प्रशासकिय मान्यतेसाठी नगरविकास विभागाकडे प्रलंबित असणे, स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वारंवार शासनाकडे पाठपुरावा करुनही अद्याप उपरोक्त विकास कामांना उपलब्ध न झालेला निधी, निधीअभावी गेल्या २-३ वर्षांपासून सदर योजनांची रखडलेली कामे, ठाणे शहरातील नागरिकांनी क्लस्टर योजनांना केलेला तीव्र विरोध, विरोध डावलून नागरिकांच्या घरांवर त्यांना सुचना न देता नोंदणी क्रमांक टाकण्यात येणे. ठाणे जिल्हा झोपडपट्टी पुनर्विकास योजनेचा उडलेला बोजवारा, या योजनेत झालेली अनियमितता व भ्रष्टाचार, ठाणे म.न.पा. आणि महसूल विभागात झालेला भ्रष्टाचार, पुणे जिल्ह्यात विविध प्रकल्पांच्या पुनर्वसनाच्या भुखंड वाटपात झालेला भ्रष्टाचार, राज्यातील देवस्थान इनाम जमिनींची परस्पर विक्री करुन झालेला भ्रष्टाचार, विविध महसूल कायद्यांमध्ये आवश्यक असलेल्या कालबद्ध सुधारणा, नामदेववाडी को-ऑप. सोसायटी, फॉरजेट स्ट्रीट, मुंबई या सोसायटीचा मागील १५ वर्षांपासून रखडलेला पुनर्विकास, बांधकाम कामगार मंडळातील विविध वस्तु वाटपात झालेला भ्रष्टाचार तसेच मंडळाच्या सचिवाची नियमबाह्य केलेली पुनर्नियुक्ती, कोकणातील विकास कामांसाठी गेल्या ३ वर्षांपासून न देण्यात आलेला निधी, कोकणात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या प्लॅनला गेल्या दोन वर्षात न देण्यात आलेली मंजुरी, पावसामुळे नादुरुस्त झालेल्या कोकणातील साकव तसेच पुलांची तातडीने दुरुस्ती करण्याची आवश्यकता, तसेच शाळा इमारती, अंगणवाडी इमारती, ग्रामपंचायत कार्यालयांच्या

इमारतींसाठी निधी मंजूर करण्याची आवश्यकता, अतिवृष्टीमुळे कोकणात रस्ते खराब होण्याचे प्रमाण अधिक असल्याने रस्त्यांसाठी विशेष निधीची आवश्यकता, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाचे अत्यंत धिम्या गतीने सुरु असलेले काम, मे, २०२५ मध्ये पडलेल्या अवकाळी पावसामुळे सदर महामार्गावर मोठ्या प्रमाणावर पडलेले खड्डे व त्यामुळे वाढलेले अपघाताचे प्रमाण, राज्यातील तिर्थक्षेत्रांना जोडणारा "शक्तीपीठ महामार्ग" बांधण्याची शासनाची योजना, राज्यातील १२ जिल्ह्यातून जाणारा सदर महामार्ग, तिर्थक्षेत्रांकडे जाण्यासाठी अगोदरच असलेले रस्त्यांचे जाळे, सदर महामार्गाला राज्यातील जनतेचा असलेला विरोध, तसेच गेल्या काळात राज्याच्या आरोग्य खात्यातील आणखी एक गंभीर प्रकरण उघडकीस येणे, लसींच्या साठवणुकीसाठी महत्त्वाच्या असलेल्या कोल्ड चेन उपकरणांच्या तब्बल ६२ कोटींच्या टेंडर प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून येणे, खुल्या बाजारातील किंमतीच्या चार ते पाचपट दरात खरेदी करुन अधिकारी आणि ठेकेदारांनी सुमारे ४० ते ५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार करणे, सार्वजनिक आरोग्य विभागात वैद्यकीय उपकरणे खरेदीसाठी काढलेल्या RT १४५ क्रमांकाच्या ५६ कोटी रुपयांच्या निविदा प्रक्रियेत मोठी अनियमितता आणि संगनमत असणे, आवश्यक वैद्यकीय उपकरणे आणि साहित्याच्या खरेदीत झालेला घोटाळा, जीईएम पोर्टलवर या यंत्राची किंमत सुमारे ४ लाख ४८ हजार रुपये इतकी असणे, हेच यंत्र आरोग्य विभागाने प्रत्येकी सुमारे ६ लाख १० हजार रुपये दराने खरेदी करणे, आरोग्य विभागातील जिल्हा आरोग्य अधिकारी आणि खनिकर्म विभागातील जिल्हा खनिकर्म अधिकारी व ठेकेदार संस्थेने संगनमताने कुठलीही विहित खरेदी प्रक्रिया राबविली नसल्याचे दिसून येत असून यंत्रसामुग्रीची बाजारातील किंमतीची शहानिशा न करता अधिकच्या दराने खरेदी करण्यात येणे, मराठवाडा व विदर्भात नवीन उद्योग व गुंतवणूक आणण्याबाबत शासनाच्या उदासीनतेमुळे बेरोजगारी व आत्महत्यांचे प्रमाण वाढणे, राज्यातील औद्योगिक प्रकल्प बाहेर जाणे, वैधानिक विकास मंडळांच्या पुनरुज्जीवनाबाबत केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा न केल्यामुळे मागास भागात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला अनुशेष, जातीचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्यात होत असलेली अक्षम्य दिरंगाई, शासनाच्या विविध योजनांना लाभ व्हावा म्हणून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सोय असणे, असे अर्ज करीत असताना संपूर्ण दिवसभर सर्व्हर डाऊन राहत असल्याने केवळ एका अर्जासाठी संपूर्ण दिवस वाया जाणे, शासनाच्या विविध विभागातील पदभरती करीता आयोजित करण्यात येत असलेल्या परिक्षांचे शुल्क अत्यंत जास्त असल्याने गरीब कुटुंबातील परिक्षार्थींना शुल्क भरण्यात अडचणी येणे, ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा सेविकांच्या पगारवाढीचा प्रश्न प्रलंबित असून काही महिन्यांपासून त्यांना पगारही न मिळणे, रोजगार देण्याची संधी असतानाही राज्यातील विविध विभागाअंतर्गत रिक्त असलेल्या २ लाख ४० हजार जागा न भरणे, ठराविक सदस्यांनाच विकास कामांसाठी निधी उपलब्ध होत असल्याने समतोल विकासाच्या संकल्पनेला बसलेला खीळ, त्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

दहा : (बुधवार, दिनांक १६ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

सर्वश्री अतुल भातखळकर, अर्जुन खोतकर, दिलीप वळसे-पाटील, डॉ.संजय कुटे, सर्वश्री अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, ॲड. राहुल कुल, डॉ.तानाजी सावंत, श्री. संजय बनसोडे, डॉ.राहुल आहेर, सर्वश्री दिपक केसरकर, चेतन तुपे, रणधीर सावरकर, रमेश बोरनारे, शेखर निकम, श्रीमती सीमाताई हिरे, सर्वश्री राजेंद्र गावित, प्रकाश सोळंके, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री विजय शिवतारे, अनिल पाटील, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री शांताराम मोरे, सुधीर मुनगंटीवार, राजकुमार बडोले, किशोर पाटील, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री प्रताप पाटील-चिखलीकर, मंगेश कुडाळकर, सर्वश्रीमती सुलभा गायकवाड, सुलभा खोडके, सर्वश्री प्रकाश सुर्वे, गोपीचंद पडळकर, नरेंद्र भोंडेकर, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रशांत बंब, निलेश राणे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री विक्रम पाचपुते, महेश शिंदे, दिलीप बनकर, प्रवीण दटके, संजय गायकवाड, प्रदीप जैस्वाल, हरिष पिंपळे, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री देवराव भोंगळे, राजेश क्षिरसागर, चंद्रकांत नवघरे, डॉ. तुषार राठोड, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री सचिन पाटील, सुमित वानखेडे, चंद्रकांत सोनवणे, सुहास कांदे, अभिमन्यू पवार, शंकर मांडेकर, चंद्रदिप नरके, सुनिल कांबळे, काशिनाथ दाते, महेंद्र दळवी, भिमराव तापकीर, नारायण कुचे, नरेंद्र मेहता, महेंद्र थोरवे, विजयसिंह पंडित, अशोक पाटील, किसन कथोरे, हिरामण खोसकर, बालाजी कल्याणकर, संजय केळकर, ज्ञानेश्वर कटके, संतोष बांगर, मोहन मते, विलास तरे, संतोष दानवे, विश्वनाथ भोईर, उमेश यावलकर, चंद्रकांत पाटील, किशोर जोरगेवार, आमश्या पाडवी, महेश लांडगे, राजेंद्र यड्रावकर-पाटील, शरद सोनवणे, समीर कुणावार, श्रीमती रंजनाताई जाधव, सर्वश्री अमित साटम, मुरजी पटेल, दिलीप लांडे, योगेश सागर, तुकाराम काते, अमोल पाटील, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री किरण सामंत, सुहास बाबर, विठ्ठल लंघे, प्रकाश भारसाकळे, बाबुराव कदम-कोहळीकर, सत्यजित देशमुख, सुरेश धस, बबनराव लोणीकर, समाधान आवताडे, आनंद तिडके, हिकमत उढाण, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री अमोल खताळ, राजेश मोरे, मंगेश चव्हाण, विलास भुमरे, मिहिर कोटेचा, पराग शाह, मोनिका राजळे, अनुपभैय्या अग्रवाल, समीर मेघे, प्रशांत ठाकूर, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री संजय उपाध्याय, राजन नाईक, राणाजगजितसिंह पाटील, राजेश पवार, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री प्रताप अडसड, सुभाष देशमुख, राजेश वानखडे, विजय देशमुख, राजेश बकाने, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री देवेंद्र कोठे, सचिन कल्याण-शेट्टी, श्याम खोडे, श्रीमती अनुराधा चव्हाण, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री जितेश अंतापुरकर, अमल महाडिक, शंकर जगताप, चैनसुख संचेती, केवलराम काळे, हेमंत रासने, करण देवतळे, डॉ. मिलिंद नरोटे, श्री. रत्नाकर गुट्टे, कॅ. आर. तमील सेल्वन, कृष्णा खोपडे, शिवाजी पाटील, काशिराम पावरा, दिलीप बोरसे, चरणसिंग ठाकूर, किसन वानखेडे, सुधीर गाडगीळ,

**विजय रहांगडाले, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री अमोल जावळे, सिद्धार्थ शिरोळे, राहुल आवाडे, राघवेंद्र पाटील, संजय पुराम, राजू तोडसाम, मनोज घोरपडे, किर्तीकुमार भांगडिया, श्रीमती सई डहाके, सर्वश्री रमेश कराड, संभाजी निलंगेकर-पाटील, सुरेश भोळे, विनोद अग्रवाल, रविशेठ पाटील, तान्हाजी मुटकुळे, प्रविण तायडे, शिवाजी कर्डिले, भिमराव केराम, श्रीमती स्नेहा दुबे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात परकीय थेट गुंतवणूक आणि स्टार्टअप संख्येच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य देशात आघाडीवर असणे, शासनाने स्टार्टअप युको सिस्टीम उभी करण्यासाठी १२० कोटी रुपयांचा 'फंड ऑफ फंडस्' तयार केला असून त्यायोगे आर्थिक सक्षम आणि विक्रीयोग्य स्टार्टअप्सना आर्थिक मदत दिली जाणार असणे, सर्क्युलर इकॉनॉमीवर भर देत महाराष्ट्र राज्य देशाची स्टार्टअप राजधानी बनली असणे, समृध्दी महामार्गामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांचा भूगोल व अर्थकारण बदलणार असणे, दावोस येथे ६३ कंपन्यांशी झालेल्या सामंजस्य करारातून १५ लाख ७२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणि १६ लाख रोजगार निर्मिती अपेक्षित असणे, नवीन औद्योगिक धोरणातून सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच अंतराळ, संरक्षण, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करण्याचे नियोजन असल्याने राज्यातील तरुणांना रोजगारांच्या नव्या संधी उपलब्ध होणार असणे, पुर्व व पश्चिम विदर्भात औद्योगिक व परकीय गुंतवणूक करण्याची व कापुस उत्पादकांच्या आत्महत्या रोखण्याकरिता कापड उद्योगास चालना देण्याची आवश्यकता, राज्यातील मुंबई, नागपूर, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, संभाजीनगर इ. मधील शहरी भागात वारंवार विज खंडीत होणे, अनियमित पाणीपुरवठा, मलः निस्सारण प्रकल्पांची कमतरता, भुयारी गटारे इ. मुलभूत नागरी समस्या भेडसावत असल्याने त्यांचे निराकरण करण्याकरिता तातडीने लक्ष देण्याची व प्रारुप विकास आराखड्यामध्ये त्याबाबत तरतूद करण्याची आवश्यकता, महिला सक्षमीकरणासाठी राज्यात आदिशक्ती अभियान राबविण्यात येणार असणे, महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणा-या महिलांना आदिशक्ती पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात येणे, महिलांच्या आरोग्याबाबतच्या समस्यांचे संवेदनशीलपणे निवारण करणे, कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यूचे प्रमाण कमी करणे, मुलींमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढविणे, लैंगिक आणि शारीरिक अत्याचाराला प्रतिबंध करणे, पंचायत राज पध्दतीत महिला नेतृत्वाचा सहभाग वाढविणे, महिलांना आर्थिक सक्षम करणे इ. या अभियानाची उद्दीष्ट असणे, लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या पावनपर्वात राज्यातील महिला स्वयंसिध्दा होण्याच्या दृष्टीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना सुरु करण्यात आली असणे, या योजनेंतर्गत १५ एप्रिल, २०२५ पर्यंत ५२ महिलांना एकूण २ कोटी ३४ लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात आले असणे, राज्यातील महिलांमध्ये 'जागतिक दर्जाचे कुशल मनुष्यबळ तयार करणे' आणि नोकरी मागणाऱ्याऐवजी नोकऱ्या देणारे नागरिक घडविणे यासाठी महिलांचे योगदान

निर्णायक ठरणार असणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सहकारी तत्वावरील महामंडळासाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद केली असणे, मेंढपाळांसाठी कर्ज योजना, पावसाळ्यात चराई रान राखून ठेवणे, राज्यातील धनगर वाड्यांना मुख्य रस्त्यांशी जोडणे, धनगर समाज बांधवांसाठी दरवर्षी २५ हजार घरे बांधणे इ. धोरण राबविण्यात येणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या मंदिर पुनर्निमाणाच्या कामाला अभिवादन म्हणून राज्यातील विविध ७ तिर्थस्थळांच्या विकासासाठी ५,५०३ कोटी रुपयांच्या आराखड्याला मंजूरी देण्यात आली असणे, अहिल्यानगर येथे मुलींसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यात आली असणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या स्मृतीस्थळांचे जतन व संवर्धनासाठी ६८१ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असणे, 'विकसित भारत व विकसित महाराष्ट्र' घडविण्यासाठी अधिक कार्यवाही करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**अकरा : अंतिम आठवडा प्रस्ताव :-**

**सर्वश्री जयंत पाटील, आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री भास्कर जाधव, नाना पटोले, रोहित पाटील, सुनिल प्रभू, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पवार, अजय चौधरी, अमीन पटेल, उत्तमराव जानकर, दिलीप सोपल, अमित देशमुख, संदिप क्षिरसागर, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, बापूसाहेब पठारे, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री नारायण पाटील, सुनिल राऊत, अमित झनक, अभिजीत पाटील, संजय पोतनीस, विकास ठाकरे, राजू खरे, नितीन देशमुख, शिरीषकुमार नाईक, वरुण सरदेसाई, संजय मेश्राम, डॉ. बाबासाहेब देशमुख, श्री. अनंत (बाळा) नर, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री हारुन खान, साजिद खान पठाण, महेश सावंत, हेमंत ओगले, प्रविण स्वामी, रामदास मसराम, अनिल मांगुळकर, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिद्धार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :-**

"राज्यात खुनाच्या घटनांमध्ये झालेली प्रचंड वाढ, राज्यात अंमली पदार्थांचा वाढलेला वापर, राज्यातील महिला व बालिका तसेच मुलांवर सुद्धा अत्याचार व बलात्काराचे वाढत असलेले गुन्हे, एकंदरीतच राज्यात बिघडलेली कायदा व सुव्यवस्था, राज्यात महापुरुषांच्या प्रतिमांची व पुतळ्यांची होत असलेली विटंबना, त्यास आळा घालण्यास पोलिस यंत्रणेस आलेले अपयश, राहुरी, जिल्हा अहिल्यानगर येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धाकृती पुतळ्याची झालेली विटंबना, विटंबना करणाऱ्या आरोपींना अटक करण्यास सरकारला आलेले अपयश, ठाणे शहरात जमील शेख यांची झालेली निर्घृण हत्या व तपासातील पोलिसांचा हलगर्जीपणा, ठाणे येथील एका ट्रस्टच्या विश्वस्तांनी बेकायदेशीररित्या जमीन विक्री करुन सुमारे २ हजार कोटींचा केलेला आर्थिक घोटाळा, यामध्ये प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांचे संगनमत असणे, सदर प्रकरणी मा. मुख्यमंत्री महोदयांनी आश्वासन देऊन सुद्धा कार्यवाही करण्यासाठी पोलीस करत असलेली

चाल-ढकल, येऊर, जिल्हा ठाणे येथील वन विभाग आणि आदिवासी व्यक्तींच्या ७५ एकर जमीनी खाजगी व्यक्तींकडून हक्क नसतांना बेकायदेशीररित्या ताब्यात घेऊन बंगले बांधण्यात येणे, आदिवासींच्या जमिनी जबरदस्तीने हडप करणे, पुरोगामी कार्यकर्ते श्री. प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेला जीवघेणा हल्ला, त्यात पोलीस यंत्रणेचा सहभाग असल्याचा संशय, दोषींवर कडक कारवाई करण्याची होत असलेली मागणी, राजकीय कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल करण्याचे राज्यात वाढलेले प्रमाण, बीड येथील महादेव मुंडे हत्या प्रकरण, परभणी येथील सोमनाथ सुर्यवंशी हत्या प्रकरण, कामराज निकम ता. शिंदखेडा जि. धुळे यांच्यावर आकसापोटी दाखल केलेले खोटे गुन्हे, असे खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, विठाबाई पडळकर, वय वर्ष ८२ रा. पडळकरवाडी, ता. आटपाडी येथे राहणाऱ्या महिलेची फसवणूक करून तिची १७ एकर जमीन लाटल्याचा घडलेला प्रकार त्यावर कार्यवाही करण्याबाबत पोलीस तसेच महसूल यंत्रणा करत असलेली दिरंगाई, यश यादव या विद्यार्थ्याचा श्रद्धा अकॅडमी, इचलकरंजी येथील हॉस्टेलमध्ये झालेला संशयास्पद मृत्यू, त्यावर पोलिसांच्या तपासातील हलगर्जीपणा, बनावट शासन निर्णय काढून अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये विकासकामे करून शासनाची केलेली फसवणूक, सार्वजनिक बांधकाम, नगरविकास, पाणी पुरवठा या विभागांमध्ये कंत्राटदारांची थकलेली बिले व त्यामुळे विकासकामांवर होणारा परिणाम, सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागाचा निधी इतर विभागांकडे वळवून मागासवर्गीय समाजावर करण्यात आलेला अन्याय, राज्यातील विशेषतः नागपूर जिल्ह्यात शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये झालेला घोटाळा, विविध विभागात वस्तू वाटप योजनेमध्ये अधिकारी व कंत्राटदारांच्या रॅकेट ने केलेला प्रचंड भ्रष्टाचार, बांधकाम कामगार मंडळातील सचिवाला नियमबाह्य पद्धतीने दिलेली मुदतवाढ, वीज कायदा २००३ मधील तरतुदींविरुद्ध महावितरण कंपनी मार्फत ग्राहकांकडून करण्यात येत असलेली "वहन शुल्काची" वसुली, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत न मिळालेले प्रोत्साहनपर अनुदान, शासनाने विधानसभा निवडणुकीपूर्वी विविध महामंडळांची स्थापना करण्याची केलेली घोषणा, परंतु अद्यापही त्यावर न झालेली कार्यवाही, परशुराम आर्थिक विकास महामंडळाची स्थापना झालेली नसताना बेकायदेशीरपणे केलेले कार्यालयाचे उद्‌घाटन, माहे डिसेंबर, २०२४ पासून आतापर्यंत ७ ते ८ महिन्यांमध्ये राज्यात गैरव्यवहार व गैरप्रकाराची अनेक प्रकरणे उघडकीस येणे, अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रवरानगर येथील एका साखर कारखान्याने बनावट कागदपत्रे तयार करुन बँकेकडून शेतकरी, सभासद यांचे नावे ८ कोटी ८६ लाख रुपयांचे कर्ज मंजूर करुन केलेला गैरव्यवहार, याप्रकरणी ५४ व्यक्तींविरुध्द एप्रिल, २०२५ मध्ये फसवणुकीचे दाखल करण्यात आलेले गुन्हे, मुंबईतील जुहुतारा रोड येथील "आजिवसन" गृहकुल संकुलासाठी एक शासकीय भूखंड मे, १९८८ मध्ये आणि दुसरा भूखंड एप्रिल २००३ मध्ये देण्याचा घेतलेला निर्णय, सदर निर्णयातील अटी व शर्तीचा भंग संबंधित संस्थेने केला असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी यांनी केलेल्या चौकशीच्या अहवालात नमूद असणे, मुंबईतील मिठी नदीमधील गाळ उपसणे, सफाई करणे इत्यादी कामात

६५ कोटी रुपयांचा करण्यात आलेला गैरव्यवहार, सदर प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेच्या अधिका-यांनी आझाद मैदान पोलीस स्थानकात मे, २०२५ मध्ये गुन्हा नोंदविणे, बीड जिल्ह्यातील मस्साजोग ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्याप्रकरणी तत्कालीन मंत्र्यांचे वृत्तपत्रात आलेले नाव, वस्तु व सेवा (जीएसटी) विभागातील अधिकारी/कर्मचारी करदात्यांची गोपनीय माहिती इतरांना पैशाच्या बदल्यात देत असल्याची मे, २०२५ मध्ये मा. उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांचेकडे करण्यात आलेली तक्रार, मुंबईतील गोवंडी येथील शिवाजीनगर पोलीस स्थानकातील वरिष्ठ पोलीस निरिक्षकांनी एका शैक्षणिक संस्थेकडून १ लाख रुपयांची लाच घेताना दि.१३ मे, २०२५ रोजी त्यांना करण्यात आलेली अटक, धुळे येथील शासकीय गुलमोहर विश्रामगृहातील कक्ष क्र.१०२ मध्ये दि.२१ मे, २०२५ च्या सुमारास पोलीसांकडून जप्त करण्यात आलेली सुमारे १ कोटी ८४ लाख रुपयांची रोख रक्कम, सदर प्रकरणी चौकशी अहवालास होत असलेला विलंब, ३४१ कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराची दि.०४ जून, २०२५ च्या सुमारास सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती अंजली दमानिया यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांकडे सुपुर्द केलेली कागदपत्रे, याबाबत त्वरीत चौकशी करण्याची आवश्यकता, बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिका घेतल्याच्या प्रकरणात एका मंत्र्यांना नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने दोन वर्षाची शिक्षा देण्याचा दिलेला निर्णय, छत्रपती संभाजीनगर येथील वेदांत हॉटेल (नवीन नाव विट्स) च्या मुल्यांकन अहवालानुसार ११० कोटी रुपये किंमत असतांना केवळ ६५ ते ६७ कोटी रुपयांना एका मंत्र्याच्या मुलाचा समावेश असलेल्या कंपनीने केलेली खरेदी, सदर गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मा. मुख्यमंत्री यांचेकडे करण्यात आलेली मागणी, याच मंत्र्याच्या घरी नोटा असलेली बॅग व बाजूला मंत्री महोदय सिगारेट ओढत असल्याचे वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेले फोटो, सन २०१९ ते २०२२ या कालावधीत नागपूर व इतर अनेक जिल्ह्यात १ हजारांहून अधिक अपात्र शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी नावे यादीत सामील करुन हजारो कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी चौकशी करण्याचे मा. शिक्षणमंत्री यांनी संबंधितांना एप्रिल, २०२५ मध्ये दिलेले आदेश, एका मंत्र्याचे स्वीय सहाय्यक यांनी दोन कोटी रुपये खंडणी मागितल्याची एक महिलेने दहिवडी पोलीस स्थानकात दाखल केलेली तक्रार, गेल्या ६ महिन्यांपासून राज्यातील शिवभोजन केंद्रांना निधी मिळत नसल्याने सदर केंद्र बंद पडण्याचा निर्माण झालेला धोका, त्यामुळे गोरगरीब जनतेचे होणारे हाल, राज्यातील ग्रामीण भागामध्ये सर्पदंश, विंचूदंश, प्रसुती इत्यादी आरोग्य सेवांचा उडालेला बोजवारा CCMP व BHMS डॉक्टरांना महाराष्ट्र मेडीकल काउन्सीलमध्ये रजिस्ट्रेशन मिळण्यासाठी येणाऱ्या अडचणी, सदर डॉक्टरांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत शासन निर्णय होऊनही अद्यापही सामावून न घेणे, सदर मागणीसाठी जवळपास १ लाख डॉक्टरांनी आझाद मैदान येथे गेले ३ दिवस केलेले धरणे आंदोलन, कोल्ड चेन उपकरण खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार, मुंबई शहरातील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासामध्ये येणाऱ्या अडचणी, मुंबईतील एसआरए योजनेमध्ये होत असलेला मोठ्या प्रमाणातील गैरव्यवहार, त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष. आरे कॉलनी मेट्रो कारशेड आंदोलकांवरील

गुन्हे मागे घेण्याची आवश्यकता, उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत म्हारळ उल्हासनगर येथील स.न. ४० ते ५८ मधील ८३ एकर ०९ गुंठे जमीनीच्या हस्तांतरण प्रकरणात विविध अनियमितता व अधिकाराच्या कक्षेचे उलंघन करण्यात येणे, अश्या प्रकारे मुंबई व ठाणे येथे अनेक बिल्डींग व बांधकाम व्यवसायिक करत असलेला गैरव्यवहार, अधिराज कॅपिटल सिटी, रोहिंजण, अप्पर खारघर, ता पनवेल येथील रहिवाशांना रस्ता व पाण्याअभावी प्रचंड मानसिक व शारीरिक त्रास झाला असणे, ओसी न मिळाल्यामुळे सद्यस्थितीत सुमारे ५०० कुटुंबांना घराचा ताबा दिला असला तरी रस्ता, पाणी, वीज, उदवाहन इत्यादी मुलभूत सुविधांच्या अभावी प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागणे, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी अंतर्गत असलेल्या महाजनको मध्ये झालेल्या अतिरिक्त कार्यकारी अभियंता व कार्यकारी अभियंता या पदांच्या भरती प्रक्रियेत गंभीर त्रुटी, अन्याय व अपारदर्शकता असणे, भामरागड तालुक्यातील पंचायत समितीतील बीडीओने रोहयोची कामे न करता करोडो रुपयांची बिले काढून केलेला भ्रष्टाचार, गडचिरोली जिल्हयातील अंगणवाडी सेविका, मदतनीस भरतीमध्ये खोटे शैक्षणिक प्रमाणपत्र जोडून पात्र करुन केलेला गैरप्रकार, धनगर समाजातील मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणासाठी खोटी विद्यार्थी संख्या दाखवून जालना, संभाजीनगर जिल्हयातील अनेक संस्था चालकांनी केलेली लूट, नागपूर विभागात सार्वजनिक वितरण व्यवस्थेसह अन्न धान्य वाहतूक पुरवठ्याचे कंत्राट अन्न व नागरी पुरवठा विभागाने नियमबाह्य ठेका देऊन वाहतूकदार व अधिकाऱ्यांशी संगनमताने केलेला भ्रष्टाचार आणि भंडारा, गोंदिया जिल्हयात मोठ्या प्रमाणात विकलेला तांदुळ निदर्शनास येऊनही कार्यवाही न होणे, तसेच काळ्या यादीतील कंत्राटदारास पुरवठा आदेश देणे, वारंवार मुदतवाढ देणे, यातून मोठ्या प्रमाणात झालेला गैरव्यवहार याबाबत करावयाची कार्यवाही."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : १६ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा.